रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १५
www.ramprahar.com
शुक्रवार १ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून कोकण विभागाला मदत/२
आजपासून रायगड जिल्ह्यात महसूल सप्ताह/५
राज्यस्तरीय लगोरी स्पर्धेत रायगडला दुहेरी मुकुट/८

## केंद्राकडून महाराष्ट्रासाठी दोन रेल्वे प्रकल्पांना मान्यता

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार समितीने रेल्वे नेटवर्कच्या



विस्तारासाठी चार प्रमुख प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांचा अंदाजे खर्च सुमारे ११,१६९ कोटी रुपये आहे. यामुळे भारतीय रेल्वेचे जाळे ५७४ किमीने वाढेल. याचा थेट फायदा महाराष्ट्र, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, ओडिशा आणि झारखंड या राज्यांना होईल. मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या या रेल्वे प्रकल्पांपैकी दोन प्रकल्प महाराष्ट्रातील आहेत. यापैकी एक इटारसी-नागपूरदरम्यान बांधण्यात येणारा चौथा मार्ग आणि दुसरा छत्रपती संभाजीनगर-परभणीदरम्यान रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण आहे. या दोन्ही प्रकल्पांवर ७,६३० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. या प्रकल्पांमुळे लॉजिस्टिक्स खर्चात मोठी कपात, लाखो रोजगाराच्या संधी आणि हरित विकासासह राज्याला फायदा होईल.

### मालेगाव बॉम्बस्फोट खटला

# सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

**मालेगाव : प्रतिनिधी**

मालेगाव येथे २००८मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटातील सर्व सातही मुख्य आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कायद्यांतर्गत स्थापन विशेष न्यायालय गुरुवारी (दि. ३१) हा निकाल दिला.



मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाची सुनावणी सुमारे १७ वर्षांनंतर अखेर पूर्ण झाली. विशेष न्यायालयाचे न्यायाधीश ए.के. लाहोटी यांनी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांची पुराव्याअभावी सुटका केली. त्याचप्रमाणे बॉम्बस्फोटातील मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपये देण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत.

> **तुरुंगात मला टॉर्चर करण्यात आले. माझे आयुष्य उद्ध्वस्त केले. मी सतरा वर्ष अपमानित झाले. मला स्वतःच्याच देशात आतंकवादी ठरवण्यात आले. संन्यासी आहे, म्हणून मी जिवंत आहे.**
> **-साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर**

२९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगाव येथील मशिदीजवळ बॉम्बस्फोट होऊन सहा जण ठार आणि १००हून अधिक जखमी झाले होते. खटला सुरू असताना प्रकरणातील आरोपींना उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने ते जामिनावर बाहेर होते. **(पान २ वर..)**

### काँग्रेसने संपूर्ण हिंदू समाजाची माफी मागावी -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई :** मालेगाव बॉम्बस्फोटातील सर्व सातही आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या निकालानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रतिक्रिया दिली आहे. भगवा दहशतवाद हा कधीच अस्तित्वात नव्हता, आता नाहीये आणि यापुढे कधी असणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. हिंदू दहशतवादाचा आणि भगव्या दहशतवादाचा खोटा नरेटिव्ह काँग्रेसप्रणित सरकारने सेट करण्याचा प्रयत्न केला होता. संपूर्ण हिंदू समाजाला वाईट दाखवण्याचा प्रयत्न त्यांनी केला, त्याबद्दल काँग्रेसने संपूर्ण हिंदू समाजाची जाहीरपणे माफी मागितली पाहिजे, अशी रोखठोक भूमिकाही मुख्यमंत्र्यांनी मांडली आहे.

## डिजिटल अरेस्टची भिती दाखवून लुबाडणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### रायगड पोलिसांच्या सायबर शाखेची कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

डिजिटल अरेस्टची भिती दाखवून लोकांना लुबाडणाऱ्या टोळीचा रायगड पोलिसांच्या सायबर शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी आतापर्यंत ११ जणांना जेरबंद करण्यात आले आहे. यात जिओ कंपनीतील दोन सेल्स एक्झिक्युटीव्हचाही समावेश आहे. या प्रकरणातील आरोपींच्या पुढील तपासासाठी सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीची मदत घेतली जाणार आहे, अशी माहिती रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.



अब्दुस सलाम बारभुवन (वय २९, रा. आसाम), बिलाल फैज अहमद (वय ३२), नदीम महम्मद अस्लम महम्मद (वय ३०), लारैब महोम्मद रफिक खान (वय २४), शादान रेयाज अहमद खान (वय २८), मोहम्मद फैसल सेराजुद्दीन खआन (वय ३०), अभय संत प्रकाश मिश्रा (वय २९), मोहसिन मिया खान (वय ३५, सर्व रा. उत्तर प्रदेश), बलमोरी विनयकुमार राव (वय ३३), गंगाधर गंगाराम मुट्टन (वय ३४, दोघे रा. हैद्राबाद, जिओ कंपनीत सेल्स मॅनेजर), शम्स ताहीर खान (वय ३०, रा. राजस्थान) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

आरोपींकडून ३५ मोबाईल, एक आयपॅड, तीन लॅपटॉप, एक व्हिपीएन पोर्ट आणि तब्बल सहा हजार १७५ मोबाईल सिम कार्ड जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणात ११२ बँक खाती पोलिसांनी गोठवली आहेत. ८५ लाख रुपयांची बिटकॉईन्स जप्त केली आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे या गुन्ह्यातील दोन आरोपी हे उच्चशिक्षित असल्याचे तपासात समोर आले आहे. अभय संतप्रकाश मिश्रा याने बिटेक कॉम्प्युटर सायन्सची पदवी घेतली आहे, तर शम्स ताहीर खान एमबीएचा पदवीधारक आहे. **(पान २ वर..)**

## काँग्रेस नेते कैलास गोरंट्याल भाजपमध्ये



**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेस नेते, माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी गुरुवारी (दि. ३१) भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. मागील अनेक दिवसांपासून ते काँग्रेस पक्षावर नाराज होते. जालना जिल्ह्यामध्ये गोरंट्याल यांना माननारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत जालन्यामध्ये भारतीय जनता पक्षाची ताकद वाढल्याचे आणि काँग्रेसला मोठा धक्का बसल्याचे म्हटले जात आहे.

गेल्या विधानसभा निवडणुकीपासूनच कैलास गोरंट्याल काँग्रेस पक्षामध्ये नाराज असल्याची चर्चा होती. भाजप नेत्यांनी संवाद साधल्यानंतर ते भाजपच्या वाटेवर असल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर सुरू असलेल्या पक्षांतराच्या चर्चांवर गोरंट्याल यांनी शिक्कामोर्तब केले आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'कमळ' हाती घेतले.

या वेळी गोरंट्याल म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरपासून मला प्रेरणा मिळाली. एकेकाळी आपण रशिया, अमेरिकेवर निर्भर होतो, पण आता डीआरडीओ देशी शस्त्रे बनवत आहे. मी भाजपमध्ये सेवेसाठी आलोय, पदासाठी नाही. तुम्हाला शब्द देतो की, जालन्यात भाजपचा महापौर होणार. जी उरलेली काही वर्ष आहेत, त्यात मी भाजपची सेवा करेन.

## महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास आता एसआयटीकडे

**मुंबई : प्रतिनिधी**

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरणाच्या तपासासंदर्भात त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्यासह कुटुंबियांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची गुरुवारी (दि. ३१) भेट घेतली. आमदार सुरेश धसही सोबत होते. या भेटीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे सोपवण्याचा निर्णय घेत तसे आदेश दिले. त्यानुसार आयपीएस अधिकारी पंकज कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी स्थापन करण्यात आली आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णवाहिका सेवा, जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

### ४ ऑगस्टला खिडूकपाडा येथे समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप महाराष्ट्र वाहतूक संघटनेच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णवाहिका सेवा आणि भाजप जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता सुलोचना इनक्लेव, खिडूकपाडा गाव येथे होणार आहे.



समारंभाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जे.एम. म्हात्रे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, कळंबोली शहराध्यक्ष अमर पाटील, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक रवींद्र भगत, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका प्रिया भोईर, वाहतूक संघटनेचे उपाध्यक्ष अतुल घरत, ॲड. प्रतिभा भोईर, विजय भोईर, सरस्वती काथारा आदी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक सुरेश भोईर यांच्या नियोजनाखाली शंकुनाथ भोईर, कमलाकर भोईर, प्रभाकर उलवेकर, निलेश भोईर, देवदास भोईर, धनाजी भोईर, राहुल उलवेकर, अंकुश भोईर, अमर उलवेकर, सूरज गोंधळी, मिन्नाथ भोईर, सखाराम उलवेकर, केसरीनाथ भोईर, रोहिदास ठाकूर, चंद्रकांत भोईर, विठोबा भोईर परिश्रम घेत आहेत.

## पनवेल तालुका प्रेस क्लब आणि महापालिकेतर्फे वृक्षारोपण

### आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढत्या शहरीकरणात होणाऱ्या प्रदूषणावर उपाय म्हणून वृक्षारोपण करणे अतिशय गरजेचे आहे. याच उद्देशाने पनवेल तालुका प्रेस क्लब आणि महापालिका यांच्या माध्यमातून गुरुवारी (दि. ३१) पनवेल येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.



पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे आणि पदाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रकारांचे कौतुक करून पर्यावरण संवर्धनासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने होत राहावे, असे मत व्यक्त केले.

आयुक्त मंगेश चितळे म्हणाले की, पनवेल महापालिका हद्दीत सव्वा लाख वृक्ष लागवड करण्याचे ध्येय आम्ही ठेवले असून रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येणार आहे. खारघरची टेकडीदेखील हिरवीगार करणार असल्याचे सांगून त्यांनी प्रेस क्लबच्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व कळावे याकरिता एक झाड आईच्या नावे असा उपक्रम शाळेच्या माध्यमातून राबविण्यात येतो. त्या अनुषंगाने हे वृक्षारोपण शाळेच्या आवारात आयोजित करण्यात आले असल्याचे पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी सांगितले.

या कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, **(पान २ वर..)**

## पनवेलमध्ये उद्या महारोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



युवकांच्या समस्यांची जाण असलेले कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष पनवेल, चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय अंतर्गत प्लेसमेंट सेल आणि इंटरनल क्वालिटी अशुरन्स यांच्या संयुक्त विद्यमाने २ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात महारोजगार मेळावा होणार आहे. या मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे असून विविध क्षेत्रातील नामांकित व प्रतिष्ठित अशा जवळपास ४० कंपन्या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. रोजगाराच्या शोधात असलेल्या युवकांना प्रत्यक्ष नोकरीसाठी ही सुवर्णसंधी आहे. **(पान २ वर..)**






# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून, कोकण विभागातील २,७३८ रुग्णांना २५ कोटी ८६ लाखांची मदत

**मुंबई, : रामप्रहर वृत्त**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा मोठा आधार बनला आहे. विशेषतः कोकण विभागात मागील सात महिन्यामध्ये २,७३८ रूग्णांना तब्बल २५ कोटी ८६ लाख ३७ हजार रूपयांची मदत दिली गेली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार पेपरलेस आणि डिजिटल प्रणाली तसेच जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. ज्यामुळे रुग्णांना मंत्रालयात येण्याची गरज भासत नाही. रुग्णांनी प्रथम महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांचा लाभ घ्यावा. जर या योजनांद्वारे उपचार शक्य नसतील, तर, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे संलग्न असणाऱ्या रुग्णालयातून अर्ज करता येतो. यामुळे शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होतो आणि निधीचा उपयोग खऱ्या गरजू रुग्णांपर्यंत पोहोचत असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली.

२० गंभीर आजारांसाठी मदत

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्षे २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

संपूर्ण राज्यात पेपरलेस प्रणाली, जिल्हा कक्षांची स्थापना आणि विविध सकारात्मक बदलांमुळे गरजू रुग्णांपर्यंत वेळेत मदत पोहोचत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार कक्षाचे कामकाज पारदर्शक पद्धतीने राबवले जात असून निधी खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचत आहे.

## आवश्यक कागदपत्रे :-

**रूग्णाचे आधार कार्ड ,रूग्णाचे रेशन कार्ड, रूग्ण दाखल असल्यास त्याचा जिओ टॅग फोटो जोडणे बंधनकारक आहे. तहसीलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला (१.६० लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे) संबंधित आजाराचे वैद्यकीय रिपोर्ट जोडणे आवश्यक आहे. वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र,रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असावी,अपघात ग्रस्त रूग्णांसाठी एफआयआर रिपोर्ट आवश्यक आहे. अवयव प्रत्यारोपण रूग्णांसाठी झेडटीसीसी नोंदणी पावती आवश्यक आहे. सर्व कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात aao.cmrf-mhgov.in या ई-मेलवर पाठवावीत. अधिक माहितीकरिता टोल फ्री क्र. १८००१२३२२११ या क्रमांकावर कॉल करा.**

### कोकण विभागातील मदतीचा आढावा
(१ जानेवारी ते ३० जुलै २०२५)

| जिल्हा | एकूण रुग्णसंख्या | एकूण मंजूर मदत रक्कम |
|---|---|---|
| मुंबई शहर | ४२८ | ४ कोटी ०१ लाख १५ हजार |
| मुंबई उपनगर | ३९२ | ३ कोटी ६१ लाख २९ हजार |
| ठाणे | १३३८ | १२ कोटी १० लाख १० हजार |
| पालघर | १५३ | १ कोटी २८ लाख ४१ हजार |
| रायगड | २१९ | १ कोटी ९७ लाख ०३ हजार |
| रत्नागिरी | १६४ | १ कोटी ३० लाख ६० हजार |
| सिंधुदुर्ग | ४४ | ५७ लाख ७९ हजार |

## माथेरानला आलेल्या कल्याणच्या पर्यटकांचे मोबाईल चोरले

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरानच्या निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी वॉटरफॉलवर जात असाल, तर जरा सावध राहा! तुमचा महागडा मोबाईल, पर्स, पैसे, इतर मौल्यवान वस्तू आणि अगदी तुमचे वाहनही चोरीला जाऊ शकते. कर्जत तालुक्यातील पर्यटक स्थळी गेल्या काही काळात मोबाईल आणि दुचाकी चोरीचे प्रकार सतत समोर येत असून पुन्हा एक घटना घडली आहे.

कल्याण येथून माथेरान येथे पर्यटनासाठी आलेल्या तरुणाच्या स्कुटीच्या डिकीत ठेवलेले तीन मोबाईल अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पीडित तरुण प्रवीण भालचंद्र राठोड आपल्या मित्रांसोबत माथेरान घाटातील 'वॉटरपाईप' रेल्वे स्थानकाजवळील वॉटरफॉल परिसरात गेला होता. स्कुटी पार्क करून मोबाईल सुरक्षिततेच्या दृष्टीने डिकीत ठेवून ते वॉटरफॉलचा आनंद लुटण्यासाठी निघाले. परंतु परतीच्या दुपारच्या तीन वाजण्याच्या सुमारास तीन मोबाईल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. यात ॲपल आयफोनसह सुमारे ५० हजारांपेक्षा अधिक किंमती तसेच वेगवेगळ्या कंपनीचे असे एकूण एक लाख रुपये किमतीचे मोबाईल अज्ञातांनी चोरून नेले आहेत.

यामुळे या घटनेने पुन्हा एकदा पर्यटनस्थळी मौजमजा करण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न उभा राहत असताना त्यांच्या किंमती वस्तूदेखील चोरी होऊ लागलेले आहेत. पार्क केलेल्या वाहनातून मोबाईल चोरी करणे म्हणजे शातिर चोर समजला जातो.एकूणच मागील काही आठवड्यांतच कर्जत आणि माथेरान परिसरात पर्यटकांचे मोबाईल, वाहन आणि पर्स चोरीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

दर रविवारी किंवा विकेंडला या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक गर्दी करत असतात, आणि त्याचाच फायदा घेत चोरटे सक्रिय झाले आहेत. या पाश्वभूमीवर स्थानिक प्रशासन व पोलिस यंत्रणेसमोर चोरीच्या प्रकारांना लगाम घालण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी, चोरट्यांच्या मुसक्या कधी आवळल्या जातील, याकडे पर्यटकांचे लक्ष लागले आहे.

## किरण ठाकरे यांनी श्रीराम पुलावरील खड्डे भरले



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहर व ग्रामीण भागाला जोडणाऱ्या श्रीराम पुलावर नेहमीच खड्डे पडतात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. हे खड्डे विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी स्वखर्चाने भरत असतात. भारतीय जनता पक्षाचे विधानसभा अध्यक्ष किरण ठाकरे यांनी आता हे खड्डे प्लेव्हर ब्लॉकच्या माध्यमातून भरले आहेत. त्यामुळे वाहन चालकांना दिलासा मिळाला आहे.

श्रीराम पुलावर गेल्या अनेक वर्षांपासून खड्डे पडतात. काही दिवसांपूर्वी माजी नगरसेवक संकेत भासे यांच्या माध्यमातून खड्डे भरण्यात आले होते, मात्र मुसळधार पावसामुळे पुन्हा खड्डे पडले व वाहनचालकांना कसरत करून पुलावरून जावे लागत असे.

त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी होत असे. किरण ठाकरे यांनी यावर उपाय म्हणून प्लेव्हर ब्लॉकने खड्डे भरण्याचा निर्णय घेतला आणि हा उपक्रम स्वखर्चाने राबविला. त्यामुळे वाहन चालकांना दिलासा मिळाला आहे.

याप्रसंगी कर्जत मंडल अध्यक्ष राजेश लाड, किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, माजी नगरसेवक बळवंत घुमरे, बिनिता घुमरे, संजय कराळे, अतुल बडगुजर, किशोर ठाकरे, अभिषेक तिवारी, प्रज्ञेश खेडकर, सचिन ओसवाल, मारुती देवघरे, प्रवीण बोराडे आदी उपस्थित होते.

## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वाधार धर्तीवर विशेष योजना

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या इयत्ता ११ वी, १२ वी तसेच उच्च शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक त्या भोजन, निवास व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'स्वाधार' योजनेच्या धर्तीवर विशेष योजना प्रस्तावित केली असल्याची माहिती दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.


मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात दिव्यांग कल्याण विभागाच आढावा घेण्यात आला यावेळी दिव्यांग कल्याण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त समीर कुर्तकोटी, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी अतुल वझे तसेच दिव्यांग कल्याण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सर्वसमावेशक शिक्षणाची तरतूद करण्यात आली,त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसाधारण शाळांमध्ये समाविष्ट करण्यासाठी शालेय शिक्षणव क्रीडा विभागाच्या समन्वयाने दीर्घकालीन धोरण तयार करण्यात येणार आहे.

## 'त्या' आरोपीचे दूसरे प्रकरणही समोर

**पनवेल :** खांदेश्वर येथे २७ जुलैला एका ७० वर्षीय वृद्ध महिलेची ४७ लाखांची आर्थिक फसवणूक केल्याचे प्रकरण ताजे असताना एका २१ वर्षीय तरुणाला पनवेल महापालिकेत लिपीक पदावर नोकरी लावतो असे खोटे आमिष दाखवून त्याच्याकडून सुद्धा ३ लाख ७४ हजार रुपये उकळण्याचे दूसरे प्रकरण संशयीत आरोपी सचिन मोरे याच्याविरोधात पोलिसांनी मंगळवारी दाखल केले. मोरे याला खांदेश्वर पोलीसांनी अटक केली आहे.

वृद्ध महिलेच्या प्रकरणात पोलिसांनी अटकेची कारवाई सुरू असताना मुंबई येथील घाटकोपरमध्ये राहणाऱ्या २१ वर्षीय तरुणाने मोरे याने पनवेल महापालिकेत नोकरी लावतो, असे आश्वासन देऊन त्याच्याकडून पावणेचार लाख घेतले असून अडीच वर्षापासून तो नोकरीसुद्धा लावत नाही आणि घेतलेली रक्कम परत देत नसल्याने मोरे याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा खांदेश्वर पोलीस ठाण्यात नोंदवला.

## तळा तालुक्यातील शेतकरीवर्ग वळतोय भाजीपाला उत्पन्नाकडे



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील शेतकरीवर्गाचा आता भाजीपाल्याची लागवड करून त्यातूनही उत्पन्न काढण्याकडे कल वाढत असल्याचे दिसत आहे.तालुक्यात खरीप हंगामात शेताच्या बांधावर व वरकस भागात सध्या भेंडी,मिरची वांगा व कारली दुधीभोपळा, शिराळा, पडवळ, काकडी, गवार लागवड केली आहे.

ही भाजी तयार होण्यास सुरुवात झाली असून ही भाजी आता श्रावणापासून ते गणेशोत्सवा पर्यंत राहील या कालावधीत अनेकांचे व्रतवैकल्ये असल्याने बाजारात जास्तीत जास्त भाज्यांची मागणी मोठ्याप्रमाणात होते व भावही चांगला मिळतो. यामुळे शेतकऱ्यांना अर्थिक लाभ चांगला होत असल्याने याकाळावधीतील भाज्यांचे उत्पादन हे शेतकऱ्याला फायदेशीर ठरत आहे.कारल्याला पुणे, मुंबई येथून चांगली मागणी आहे. कारल्याचे उत्पादन हे उन्हाळ्यात ही काढले जात असल्याने कारल्याच्या पिकातून मोठी अर्थिक उलाढाल होते. अशाप्रकारे भाजीपाल्याच्या उत्पादनातून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होत असते.

शेतकऱ्यांशी संवाद साधला असता शेतकरी म्हणाले की आता भेंडी, पालेभाज्या,दुधी भोपळा,पडवळ या भाज्या झाल्या असून श्रावणमास असल्याने भाज्यांना मागीणी वाढत आहे.

## माणगावच्या बहुपयोगी कालव्याची दुर्दशा

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील काळ प्रकल्प कालवा हा तालुक्यातील शेतीच्या दृष्टीने वरदान ठरलेला असूनही आज तो दुर्लक्षिततेच्या विळख्यात सापडला आहे. दरवर्षी डिसेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात सुरू होणारा हा कालवा तालुक्यातील भातशेती, भाजीपाला, फळबागा, औषधी वनस्पती आणि जलस्रोतांसाठी जीवनदायिनी भूमिका बजावत असतो, मात्र या कालव्याच्या देखभालीकडे स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि नगरपंचायतीचे दुर्लक्ष प्रकर्षाने जाणवते आहे.

रायगड जिल्ह्यात उन्हाळी शेती टिकवून ठेवणारा हा कालवा आज विलोपनाच्या उंबरठ्यावर आहे. तो प्रदूषित होत चालला आहे. संपूर्ण शहरातून वाहणारा हा कालवा केवळ शेतीसाठीच नव्हे, तर माणगावच्या सौंदर्यातही भर घालणारा आहे. शहराचे तापमान कमी करणे, पर्यावरणास पोषक असणे, पाण्याचा निचरा सुकर करणे, अशा अनेक भूमिका तो पार पाडतो. प्रशासनाचे बोट दाखवणे आणि राजकीय दुर्लक्ष कालव्याची देखभाल, दुरुस्ती, मजबुतीकरण, साफसफाई या बाबींकडे कोणीच लक्ष देत नाही.

२५ जानेवारी २०२१ रोजी तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी माणगांव जलसंपदा कार्यालयाच्या लोकार्पणप्रसंगी काळनदीवरील बंधाऱ्याच्या पूर्ततेसाठी आणि कालव्याचे मजबुतीकरण तसेच काही भागात त्याचे बंद पाईपलाईन किंवा बंधिस्त स्वरूपात रूपांतर करण्याचे आदेश दिले होते, मात्र त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

कालव्यात मोठ्या प्रमाणावर कचरा टाकणे, यंत्राच्या सहाय्याने अर्धवट स्वच्छता, देखरेखीचा अभाव, आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे या कालव्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पाचशे मीटर कालवा काँक्रीट करून वार्षिक गळतीची समस्या दूर करता येऊ शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

## मुरुड आगारातून श्रावणात अक्कलकोटला बससेवा

**मुरुड : प्रतिनिधी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रायगड विभागांतर्गत येणाऱ्या मुरुड आगाराने श्रावण महिन्याच्या निमित्ताने भाविकांसाठी एक विशेष बससेवा सुरू करण्याची घोषणा केली आहे. लालपरीच्या माध्यमातून आता भाविकांना अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी जाणे सोयिस्कर होणार आहे.

मुरुड आगाराने दिलेल्या माहितीनुसार दि .३० जुलै रोजी मुरुड येथून अक्कलकोटसाठी विशेष बस सुटेल. ही बस सकाळी ९.०० वाजता मुरुड येथून निघेल आणि अक्कलकोटला जाईल. अक्कलकोटहून परत येण्यासाठी देखील तीच बस सकाळी ९.०० वाजता अक्कलकोट येथून मुरुडसाठी प्रस्थान करेल.

या बससेवेचा मार्ग अलिबाग - लोणावळा -स्वारगेट - सोलापूर असा असणार आहे. तसेच भीमाशंकर येथे देखिल दर रविवारी बस सुटणार आहे .

## नवी मुंबई आणि नैना शहराकरिता सिडको सर्वसमावेशक परिवहन आराखडा करणार तयार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत**

सिडकोतर्फे नवी मुंबई आणि नैना (नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र) शहराकरिता सर्वसमावेशक परिवहन आराखडा तयार करण्यात येणार आहे.सन २०५४ पर्यंत पर्यावरणदृष्ट्या शाश्वत आणि सर्वसमावेशकतेवर आधारित परिवहन धोरण निर्माण करणे,सुरक्षित, कार्यक्षम व शाश्वत वाहतूक, वाहतुकीच्या सर्व साधनांचे एकात्मीकरण, सार्वजनिक वाहतुकीलाप्रोत्साहन ही उद्दिष्टे साध्य करण्याकरिता सदर आराखडा तयार करण्यात येणार आहे.

या आराखड्यामध्ये सार्वजनिक वाहतूक, खासगी वाहने व चालणे आणि सायकलिंग यांसारख्या गैरस्वयंचलित परिवहन प्रकारांचे एकात्मीकरण करून साकल्यवादी दृष्टीकोनातून परिवहनाचे नियोजन करणे अभिप्रेत आहे. वेगाने होणारे शहरीकरण, वाढती लोकसंख्या, लोकसंख्येची दाटीवाटी आणि पर्यावरणीय मुद्दे, या भविष्यातील आव्हानांवर मात करण्यासाठी सीएमपी आराखडा तयार करण्यात येणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह अटल सेतू, मेट्रो मार्ग क्र. ८ (नमुंआंवि व मुंबई आंतरराष्ट्रीयविमानतळ यांना जोडणारा), पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे मार्ग, बेलापूर ते नमुंआंवि दरम्यान मेट्रो मार्ग क्र. १ चा विस्तार या परिवहन प्रकल्पांमुळे एकात्मीक परिवहन धोरण निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर परिवहन व्यवस्थेतील त्रुटी, गुंतवणुकीसाठी प्राधान्यक्रम निश्चित करणे, परिवहनाच्यास्थानिक व प्रादेशिक गरजांना अनुसरून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करता येईल असा रोडमॅप तयार करणे याकरिता सीएमपी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे तसेच मेट्रो व अन्य सार्वजनिक परिवहन प्रकल्पांकरिता केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाकडून निधी उपलब्ध करून घेण्याकरितादेखील सीएमपी अनिवार्य आहे.

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, कॉर्पोरेट पार्क, एरोसिटी, एज्युसिटी, लॉजिस्टीक पार्क, मेडीसिटी या प्रकल्पांसह निवासी व औद्योगिक वाढ, या घटकांमुळे नवी मुंबईतील वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई क्षेत्राकरिता सिडको व अन्य प्राधिकरणांना वैविध्यपूर्ण, सर्वसमावेशक आणि भविष्यसिद्ध परिवहन प्रणाली विकसित करण्याकरिता सीएमपी मार्गदर्शक ठरणार आहे.**

**-विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## पान १ वरून

### मालेगाव बॉम्बस्फोटातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

निकाल देताना विशेष न्यायाधीश लाहोटी म्हणाले की, या प्रकरणात कोर्टासमोर सादर केलेले पुरावे दोष सिद्ध करण्यासाठी पुरेसे नाहीत. बॉम्बस्फोट झाला, मात्र मोटरसायकलमध्ये झाला हे सिद्ध होऊ शकले नाही. ती दुचाकी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांच्या मालकीची असल्याचा कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नाही. बॉम्बस्फोटातील आरडीएक्स प्रसाद पुरोहितने आणले हे सिद्ध होऊ शकलेले नाही. ज्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाला त्या ठिकाणाहून वैज्ञानिक पुरावे जमा केले गेले नाहीत. घटनास्थळाचा पंचनामाही नीट करण्यात आला नव्हता. फॉरेन्सिक अहवालही योग्य नव्हता. त्यामुळे कोणताही निष्कर्ष काढता येत नाही. अभिनव भारतच्या निधीचा वापर दहशतवादी कारवायांसाठी झाल्याचे कोणतेही पुरावे नाहीत. फक्त संशयाच्या आधारावर आरोपींना दोषी ठरवले जाऊ शकत नाही. त्यामुळे सातही आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### पनवेल तालुका प्रेस क्लब, महापालिकेतर्फे वृक्षारोपण

खालापूर प्रेस क्लब अध्यक्ष भाई ओव्हाळ, जिल्हा कार्यकारिणी सदस्य रवींद्र मोरे, पनवेल तालुका प्रेस क्लब सचिव दत्तात्रय कुलकर्णी, सहसचिव स्वप्नील दुधारे, खजिनदार राकेश पितळे, सल्लागार गणेश कोळी, संजय कदम, सुमंत नलावडे, सदस्य राजेंद्र पाटील, वर्षा कुलकर्णी, प्रतिक वेदपाठक, लालचंद यादव, गणेश घोलप आदी उपस्थित होते. या वेळी लोकनेते दि.बा. पाटील शाळा परिसरात पारिजातक, सोनचचाफा, बहावा यासारख्या सुमारे २५ रोपांची लागवड करण्यात आली.

### डिजिटल अरेस्टची भिती दाखवून लुबाडणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

२३ मे रोजी अलिबाग येथील सायबर शाखेत डिजिटल अरेस्टसंदर्भात एक तक्रार प्राप्त झाली होती, ज्यात एका वयस्कर व्यक्तीकडून ६६ लाख रुपयांची रक्कम लुबाडण्यात आली होती. मुंबई सायबर शाखेत मनी लॉण्डरिंग प्रकरणात तक्रारदारावर गुन्हा दाखल झाला असून अटक वॉरंट जारी झाले आहे. अटक टाळायची असेल तर पैसे द्यावे लागतील असे सांगून तक्रारदाराला वेगवेगळ्या खात्यात ६६ लाख रुपये जमा करण्यास आरोपींनी भाग पाडले होते.

याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यानंतर रायगडच्या सायबर शाखेने प्रकरणाचा तपास सुरू केला होता. जिल्ह्यात दाखल झालेली डिजिटल अरेस्टची ही पहिलीच घटना असल्याने या गुन्ह्याचा सखोल आणि कौशल्य पूर्ण तपास करण्याचे निर्देश सायबर शाखेच्या पोलीस निरीक्षक रिजवाना नदाफ, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल जाधव आणि उपनिरीक्षक अजय मोहिते यांना देण्यात आले होते. दीड महिना या प्रकरणाचा तपास सुरू होता. तांत्रिक कौशल्य पणाला लावून पोलिसांनी राजस्थान, उत्तर प्रदेश, आसाम, तेलंगणा येथून ११ जणांना अटक केली, ज्यात बनावट कागदपत्र तयार करणारे, टेलिकॉम सर्व्हीस प्रोव्हाईडर कंपनीचे कर्मचारी आणि काही सेशन इंटीमेशन प्रोटोकॉल कॉलिंग सर्व्हिस पुरवण्यासाठी एग्रिगेटर म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींचा समावेश आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

### पनवेलमध्ये उद्या महारोजगार मेळावा


मेळाव्यामध्ये दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर पदवीप्राप्त तसेच अकुशल उमेदवारही सहभागी होऊ शकतात. कंपन्यांच्या निरनिराळ्या विभागांमध्ये भरतीसाठी विविध प्रकारच्या पात्रता आणि क्षमतांनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हजारो रिक्त पदांवर या मेळाव्यात भरती होणार आहे.

मेळाव्याद्वारे परिसरातील बेरोजगार युवकांना स्थानिक पातळीवरच रोजगार मिळवण्याची संधी निर्माण होत असून उद्योग आणि रोजगार यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने यंदाही महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# वस्तऱ्याने वार करणाऱ्या गुन्हेगारास अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात पादचारी व्यक्तीवर वस्तऱ्याने वार करून जखमी करणाऱ्या व रोख रक्कम व मोबाईल फोन लंपास करणाऱ्या एका तडीपार गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.






मुकेश छेडा हे पनवेल, नाडकर्णी हॉस्पिटलजवळ राहत असून ते पनवेल रेल्वे स्टेशन येथे उतरून घरी जाण्यासाठी निघाले. ते एसटी डेपोकडे जाणाऱ्या रस्त्याने पायी चालत जात असताना एक अनोळखी व्यक्ती यांच्याजवळ आला आणि गांजा आहे का असे विचारण्याचा बहाने केला आणि त्यांच्या खिशातील रोख रक्कम आणि मोबाईल काढून घेतला. त्याला प्रतिकार करत असताना अनोळखी व्यक्तीने वस्तारा काढला आणि त्यांच्या शरीरावर वार करून त्यांना जखमी केले आणि तो झोपडपट्टीमध्ये पळून गेला.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपी एजाज सलीम शेख (वय २५) याचा शोध पोउनि. हजरत पठाण, पो.हवा.कुडावकर, पोना पारधी, मेथे, पोशि मोकल, काकडे आदींच्या पथकाने गुप्त बातमीदाराद्वारे पनवेल परिसरातून ताब्यात घेतले असता आरोपीला रायगड व ठाणे जिल्ह्यातून हद्दपार केले असतानाही तो पनवेलमध्ये येवून त्याने हा गुन्हा केल्याने त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तसेच त्याच्याकडून चोरीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल :** एका १५ वर्षीय मुलीचे कायदेशीर रखवालीतून अपहरण केल्याची घटना उलवे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून याबाबतचा गुन्हा उलवे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. सिमरन बाबुलाल मिन्झ (वय १५) वर्षे असे या मुलीचे नाव असून उंची सुमारे ४.८ फुट, अंगाने सडपातळ, रंगाने सावळी, चेहरा गोल, नाक सरळ, डोक्याचे केस बॉयकट, अंगात पिवळ्या रंगाची कुर्ती व पॅन्ट, कानात दोन ठिकाणी टोचलेले त्यात लहान कानातली रिंग, तिला हिंदी भाषा अवगत आहे.



सोबत मोबाईल फोन आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे ८६५५३५४१२१ किंवा पोउपनि अनिल राजूरे ८६०००००८८६९ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आजपासून उरणमध्ये विशेष महसूल सप्ताह

### शेतकरी, नागरिकांनी लाभ घेण्याचे तहसीलदारांचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

१ ऑगस्ट २०२५पासून सुरू होणाऱ्या विशेष महसूल सप्ताहात उरण तालुक्यातील शेतकरी, नागरिकांच्या जमिनी, विविध दाखल्याची पुर्तता व वाटपाच्या कार्यक्रमाची सुरुवात केली जाणार आहे. या आयोजित महसूल सप्ताहाचा तालुक्यातील शेतकरी, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घेण्याचे आवाहन उरणचे तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी केले आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यभरात १ ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यान विशेष महसुली सप्ताह साजरा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा महसूल सप्ताह राज्यातील प्रत्येक तालुक्यात राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार उरण तालुक्यातही आज शुक्रवारपासून पुढील सात दिवस विशेष महसूल सप्ताह आयोजित करण्यात येणार आहे. सप्ताहाच्या शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी महसुली संवर्गातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गुणगौरव करून त्यांना पुरस्कार, प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबियांपैकी अतिक्रमण नियमानुसार करण्यास पात्र असलेल्या कुटुंबियांचा शोध घेऊन अतिक्रमण जागांचे पट्टे वाटप करण्याचा कार्यक्रमही राबविण्यात येणार आहे.

४ ऑगस्ट २०२५रोजी कोप्रोली, विंधणे, उरण, नागाव, म्हातवली आदी प्रत्येक मंडळनिहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी, नागरिकांना आवश्यक लागणाऱ्या विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप करण्यात येणार आहे.५ ऑगस्ट २०२५ रोजी संजय गांधी योजनेतील डीबीटी न झालेल्या २९ लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात येणार आहे.

या राबविण्यात येणाऱ्या विशेष महसूल सप्ताहाचे उरण तालुक्यातील नागरिक, शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन उरणचे तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी केले आहे.

## गव्हाण परिसरातील शाळांमध्ये छत्र्यांचे वाटप

### भाजपच्या विनायक कोळी नाखवा यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते विनायक कोळी नाखवा यांचा वाढदिवस गुरुवारी (दि.३१) सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. त्या पार्श्वभूमीवर गव्हाण परिसरातील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मोफत छत्र्यांचे वाटप भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी विनायक कोळी यांनी राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते विनायक कोळी नाखवा हे दरवर्षी आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करतात. त्यानुसार यंदाच्या वर्षी रायगड जिल्हा परिषदेच्या सेंट्रल स्कूल आणि कन्याशाळेतील विद्यार्थ्यांना मोफत छत्र्यांचे वाटप कार्यक्रम आयोजीत केला होता. या कार्यक्रमात भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्याहस्ते विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. दरम्यान, या वेळी विनायक कोळी नाखवा यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच शैलेंद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच जिज्ञासा कोळी, माजी उपसरपंच विजय घरत, सदस्या गव्हाण ग्रामपंच्यायत कामिनी कोळी, योगिता भगत, भाजप नेते हेमंत ठाकूर महाराष्ट्र राज्य कोळी महासंघटनेचे अध्यक्ष विश्वनाथ कोळी, तालुका सरचिटणीस जयवंत देशमुख, व्हि.के.ठाकूर, बूथ अध्यक्ष बाळकृष्ण कोळी, रवींद्र कोळी, सुहास भगत, मुख्याधापक प्रमोद कोळी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित निबंध स्पर्धा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या मराठी माध्यमाच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागामध्ये संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त निबंध लेखन स्पर्धा शालेयस्तरावर आयोजित करण्यात आली होती.

जनतेच्या मनातील खरा लोकनेता आणि समाजाभिमुख नेतृत्व असणारे लोकनेते रामशेठ ठाकूर त्यांच्या कार्यातून जनमानसात प्रेरणेचा दीप उजळत आहेत. त्यांच्या पंचाहत्तरीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार रुजविण्यासाठी व नेतृत्वगुण जागविण्यासाठी विशेष निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे आयोजन शैक्षणिक स्पर्धा समितीमार्फत करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये पाचवी ते सातवीचे ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच आठवी ते दहावीच्या ८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पाचवी ते सातवी या गटासाठी लोकसेवेचे आदर्श श्री रामशेठ ठाकूर साहेब हा विषय निबंधासाठी देण्यात आला होता. आठवी ते दहावी या गटासाठी लोकनेते श्री रामशेठ ठाकूर एक समाजभिमुख नेतृत्व हा विषय देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण निबंधाचे लेखन केले. विद्यार्थ्यांनी उत्तम तयारी केली होती. स्पर्धेतील विषय विद्यार्थ्यांना केवळ लेखन कौशल्य वाढवण्यासाठीच नाही, तर त्यांच्या मनात आदर्श नेतृत्वाबद्दल आदरभाव निर्माण करण्यासाठीही उपयुक्त ठरणार आहे.

या कार्यक्रमसाठी सी के टी ज्युनिअर कॉलेज प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभाग मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी माध्यमिक विभाग पर्यवेक्षक कैलास म्हात्रे आदी उपस्थित होते. दरम्यान, संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, सचिव एस.टी. गडदे यांनी विद्यार्थ्यांना निबंध स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात छत्री रंगभरण स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.३१) लेखा व वित्त विभागाच्या वतीने छत्री रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



या स्पर्धेत महाविद्यालयातील सर्व शाखेतील एकूण ३० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ही स्पर्धा प्रा. योगिता पाटील यांच्या संयोजनाखाली पार पडली, तर परीक्षक म्हणून प्रमोद वाघे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. या वेळी विद्यार्थ्यांनी विविध रंगछटांचा सुरेख संगम साधत आपली सर्जनशीलता साकारली.

या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला त्यामध्ये प्रामुख्याने स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे प्रथम क्रमांक अंजली शर्मा (प्रथम वर्ष बीएमएस) द्वितीय क्रमांक गौरव गुप्ता (तृतीय वर्ष सीएस) तृतीय क्रमांक साक्षी वाघमारे (प्रथम वर्ष अकाउंट व फायनान्स) महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी विजेत्यांचे आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच त्यांनी अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेला चालना मिळते, असे नमूद केले.

या स्पर्धेसाठी अकाउंट व फायनान्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा तसेच विभागातील इतर सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



## के.जी. म्हात्रे, प्रवीण धोंगडे यांना सेवानिरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या अनुभवाच्या माध्यमातून के.जी.म्हात्रे आणि प्रवीण धोंगडे यांनी भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या पक्षाची सेवा आणि कार्यकर्त्यांना सहकार्य केल्याबद्दल केल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे आभार मानले आहेत. के.जी. म्हात्रे आणि प्रवीण धोंगडे हे शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जनसंपर्क कार्यालयात नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्यरत होते.



के.जी.म्हात्रे यांनी २००९पासून, तर प्रवीण धोंगडे यांनी २०१६पासून या कार्यालयात सेवा दिली. आपल्या प्रदीर्घ अनुभवातून त्यांनी पक्षाची सेवा केली असून कार्यकर्त्यांना सहकार्य केले. या कार्यक्रमावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन के.जी. म्हात्रे आणि प्रवीण धोंगडे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व भाजपचे विद्यमान तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल तालुका पूर्व मंडळाचे अध्यक्ष भूपेंद्र पाटील, भाजप नेते कर्णा शेलार, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, तालुका चिटणीस यतीन पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## अँटी रॅगिंग जनजागृती सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.३१) अँटी रॅगिंग समिती व विद्यार्थी तक्रार निवारण समितीच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी अँटी रॅगिंग जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगविरोधी कायद्यांची माहिती देणे, सुरक्षित आणि मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करणे हा होता. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. सुशील जाधव वाणिज्य व तंत्रज्ञान महाविद्यालय सानपाडा यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना रॅगिंगच्या कायदेशीर परिणामांबद्दल आणि संस्थेतील शिस्तबद्ध वागणुकीचे महत्त्व पटवून दिले तसेच त्यांनी सांगितले की, रॅगिंग हा एक गंभीर गुन्हा असून त्याचे मानसिक व सामाजिक परिणाम खोलवर असतात. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला तसेच प्रश्नोत्तर सत्रात अनेक विद्यार्थ्यांनी आपले अनुभव व शंका मांडल्या.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी संस्थेमध्ये रॅगिंग विरोधात महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली आणि विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचा त्रास झाल्यास तक्रार नोंदवण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे आयोजन व संचालन अँटी रॅगिंग समिती समन्वयक प्रा. प्रतीक्षा पाटील व तक्रार निवारण कक्ष समन्वयक प्रा. डॉ. रीत ठुले यांनी केले तसेच दोन्ही समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

|| Vidya Vinayen Shobhate ||
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
CHANGU KANA THAKUR
Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)
Accredited with A++ Grade by NAAC (4th Cycle-CGPA-3.52)
'College with Potential for Excellence' Status Awarded by University Grants Commission
'Best College Award' by University of Mumbai
PLACEMENT CELL
AND
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL (IQAC)
Organize
Mega Job Fair
2025
5000+ Youth to Get Opportunities!
70+ Reputed Companies Participating
Date : 2nd August 2025 | Time : 9 :00 AM onwards
Venue : Changu Kana Thakur College, Khanda Colony, Panvel
: Companies Participating :
NO ENTRY FEES
• Dress Code- Professional or Business Casual Attire
• Multiple Copies of Resume and Photocopies of Required Documents
Mr. S. S. Kamble
Chairman
Placement Cell
Prof. (Dr.) B. D. Aghav
Coordinator
Internal Quality Assurance Cell
Prof. (Dr.) S. K. Patil
Principal
C. K. Thakur A. C. S. College
New Panvel (Autonomous)
Candidate
Registration QR Code

## संपादकीय

# राष्ट्रीय हिताला प्राधान्य

भारताकडे असलेली मोठी बाजारपेठ ही भारताची जमेची बाजू आहे. चीनखेरीज अन्य कुठल्याही देशाकडे इतकी मोठी बाजारपेठ नाही. त्यामुळेच ट्रम्प यांच्या बुधवारच्या घोषणेला लागलीच प्रत्युत्तर देण्याऐवजी या घोषणेच्या परिणामांचा नीट अभ्यास करणेच अधिक योग्य ठरणार आहे. प्रथमदर्शनी ट्रम्प यांनी जाहीर केलेले आयातशुल्क मोठे दिसत असले तरी तो दबावतंत्राचाच भाग अधिक आहे हे सारेच जाणून आहेत.

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के आयातशुल्क आणि दंड आकारण्याची घोषणा बुधवारी केली. शुक्रवारी १ ऑगस्टपासून होणाऱ्या निर्यातीवर हा कर आणि दंड लागेल असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. मात्र वाढीव आयातशुल्क मूळ दहा टक्के शुल्कापेक्षा वेगळे असेल का, तसेच दंड नेमका किती असेल हे मात्र त्यांनी स्पष्ट केलेले नाही. ट्रम्प यांनी व्यापार करारांसाठी सर्व देशांना १ ऑगस्टची मुदत दिली होती. त्यापूर्वी किमान हंगामी व्यापार करार व्हावा यासाठी भारताकडून प्रयत्न करण्यात आले. दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये मार्च महिन्यापासून वाटाघाटींच्या पाच फेऱ्या झाल्या आहेत. भारताने व्यापार कराराच्या बाबतीत अमेरिकेच्या दबावाला भीक न घातल्यामुळे ट्रम्प यांनी ही अशी आततायी भूमिका घेतली असावी असे मानले जाते आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार करार संतुलित व दोन्ही देशांच्या दृष्टीने फायद्याचा असावा यावर भारताचा भर आहे. यात कृषिमाल व दुग्धजन्य पदार्थांसारख्या वस्तूंवरील शुल्क हे कळीचे मुद्दे ठरले. त्यामुळे मुदत संपण्याच्या अवघा एक दिवस आधी ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल या समाजमाध्यमावरून भारतावरील आयातशुल्क व दंडाची घोषणा केली. मात्र, याबाबत भारताची भूमिका स्पष्ट असून ट्रम्प यांच्या बुधवारच्या घोषणेच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास केला जातो आहे. देशातील शेतकरी व उद्योजकांच्या हितांना सरकारकडून सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल असे केंद्र सरकारने यावर प्रतिकिया देताना स्पष्ट म्हटले आहे. त्यासाठी नुकत्याच ब्रिटनसोबत झालेल्या मुक्त व्यापार कराराचे उदाहरणही देण्यात आले आहे. ट्रम्प यांनी आपल्या घोषणेसोबत दिलेली कारणे ही अशी आहेत. भारत आयातशुल्क अधिक लादत असल्यामुळे अमेरिकेचा भारतासोबतचा व्यापार कमी राहिला आहे. भारताकडून लावले जाणारे आयातशुल्क हे जगातील सर्वात जास्त आहे. भारताकडे अत्यंत कठोर असे कर, निर्बंध, परवाने आदी अडसरही आहेत. त्याचबरोबर भारत रशियाकडून लष्करी उपकरणांसह तेलाची खरेदी करतो. चीनदेखील रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेलाची खरेदी करणारा देश आहे. सारे जग रशियाने युक्रेनमध्ये सुरू असलेला हिंसाचार थांबवण्याचे आवाहन करीत असताना भारताकडून हे असे सुरू आहे. त्यामुळे भारतावर १ ऑगस्टपासून २५ टक्के आयातशुल्क (व्यापारकर) व दंडही आकारला जाईल असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. आपल्या संदेशात ट्रम्प यांनी भारताला मित्र असे मात्र म्हटले आहे. ट्रम्प यांच्या २५ टक्के आयातशुल्क लागू करण्याच्या घोषणेचा भारतीय घाऊक निर्यातीवर थोडा परिणाम होईल. विशेषत: पोलाद व औषधे यांची निर्यात अमेरिकेला मोठ्या स्वरुपात होते. या वस्तूंचे निर्यातदार सध्या सावध भूमिका घेऊन आहेत. यापूर्वी चीन, जपान आणि युरोपीय संघाबाबतही ट्रम्प यांनी अशीच आततायी भूमिका घेतली होती. त्यामुळेच अमेरिकेसोबतच्या व्यापार कराराविषयी आशावादी असतानाच स्वत:च्या राष्ट्रीय हिताशी तडजोड न करण्याबाबत भारत ठाम आहे.**

# गृहनिर्माण धोरण : सर्वांसाठी घराच्या दिशेने वाटचाल

राज्यातील सर्वांना घरे मिळावीत, पुनर्विकास प्रकल्पांना चालना मिळावी, झोपडपट्टीमुक्त राज्य व्हावे, शाश्वत आणि समावेशक शहरीकरण व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण– २०२५ लागू केले आहे. सन २०३० पर्यंत सर्वांसाठी सुरक्षित, परवडणारे आणि समावेशक घर उपलब्ध करून देण्याचा या धोरणाचा उद्देश आहे.

**गृहनिर्माण धोरण २०२५**

सर्वांसाठी घर आणि झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हे नवीन गृहनिर्माण धोरण तयार करण्यात येत आहे. या धोरणात आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक, अल्प उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गट यांच्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. हे धोरण माझं घर, माझा अधिकार या मूलभूत मार्गदर्शक तत्त्वावर आधारित आहे, जे २०३०पर्यंत राज्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

२००७ नंतरच्या गृहनिर्माण धोरणातील महत्त्वाचे बदल, जसे की मुंबईसाठी लागू करण्यात आलेले विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियम आणि उर्वरित राज्यासाठी लागू करण्यात आलेले एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियम यांचा विचार करण्यात आला आहे.

बांधकाम खर्च कमी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि हवामान बदलामुळे पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचा गृहनिर्माण क्षेत्रात समावेश करणे आवश्यक झाले आहे.

गृहनिर्माण विभागाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा), शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांसारख्या विविध शासकीय संस्था, संघटना, विकासक आणि विषय तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा करून हे धोरण तयार केले आहे.

राज्याने या धोरणात स्वतःला 'सुविधाकार, उत्प्रेरक, गृहशिल्पी (बिल्डर) आणि नियामक' म्हणून स्थान दिले आहे.

धोरणाची उद्दिष्टे आणि तत्त्वे – या धोरणाचे उद्दिष्ट वस्तुनिष्ठ विदा (डेटा) आधारित निर्णय प्रक्रिया आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत, परवडणारी, पर्यावरणपूरक आणि हवामान बदल सहनशील निवास व्यवस्था निर्माण करणे आहे.

अ. धोरणाची उद्दिष्टे

गृहनिर्माण सुलभता : २०३० पर्यंत सर्वांसाठी परवडणारी, पर्यावरणपूरक व आधुनिक घरे उपलब्ध करून देऊन गृहनिर्माण सुलभतेचा उद्देश साध्य करणे.

गृहनिर्माण गरज सर्वेक्षण व विश्लेषण : २०२६ पर्यंत राज्यभर, जिल्हा–निहाय गृहनिर्माण सर्वेक्षण करून पुराव्यावर आधारित नियोजन करणे.

आर्थिक वृद्धी व गतिमानता : गृहनिर्माण क्षेत्राचा आर्थिक वाढीस चालना देणारा घटक म्हणून विकास करणे, रोजगार निर्मिती व संबंधित उद्योगांना पाठबळ देणे.

पर्यावरणीय शाश्वतता : गृहनिर्माणासाठी पर्यावरणपूरक साहित्य व तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे.

परवडणारी घरे : राज्यातील अतिदुर्बल घटकांसाठी परवडणाऱ्या, शाश्वत, सुरक्षित घरांची निर्मिती करणे.

झोपडपट्टी पुनर्वसन : झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करणे व राहणीमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे, झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र साध्य करणे.

शहरी नियोजन व पायाभूत एकात्मिक सुविधांचा विकास : गृहनिर्माणास रस्ते, पाणी, मलनिःस्सारण इत्यादी आवश्यक पायाभूत सुविधांशी जोडून संघटित विकास साधणे.

'वॉक टू वर्क' संकल्पना: गृहनिर्माण व रोजगाराच्या संधी यांचा परस्परासंबंध प्रस्थापित करून प्रवासाचा वेळ कमी करणे.

नियमन व अंमलबजावणी: दर्जा, सुरक्षितता व परिणामकारक देखरेख सुनिश्चित करण्यासाठी गृहनिर्माण क्षेत्रातील नियमन अद्ययावित करणे.

भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण : प्रोत्साहन व सक्षम नियामक आराखड्याद्वारे राज्यात भाडे तत्त्वावरील घरांच्या वाढीवर लक्ष केंद्रित करणे.

सर्वसमावेशक वाढ : ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, नोकरदार महिला व औद्योगिक कामगार यांच्यासाठी विशिष्ट गरजांचा विचार करणे.

आधुनिक तंत्रज्ञान : टिकाऊ, किफायतशीर व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे.

स्वशासकीय संस्था व विचारवंतांचा सहभाग : धोरण अधिक लोकाभिमुख व भविष्यवेधी बनवण्यासाठी स्वशासकीय संस्था व विचारवंतांचा सहभाग.

ब. धोरणाची तत्त्वे – परवडणारी, सर्वसमावेशक, शाश्वत आणि पुनर्निर्माणशील ही या धोरणाची चार मुख्य तत्त्वे आहेत.

परवडण्याजोगे : परवडणाऱ्या दरात जमीन, चटई क्षेत्र निर्देशांक, प्रोत्साहन, शुल्कात सवलत इत्यादींद्वारे घरांची उपलब्धता सुनिश्चित करणे. आर्थिक सहाय्य व गृहनिर्माणासाठी वित्त पुरवठा करून स्वस्त किमतीत घरे उपलब्ध करणे.

बांधकाम स्वस्त असले तरी गुणवत्ता आणि सुरक्षिततेचे किमान निकष पाळणे.

सर्वसमावेशक : आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक आणि अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी सामाजिक गृहनिर्माण व आर्थिक सहाय्य.

ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिकदृष्ट्या विकलांग रहिवाशांना सर्व गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये सुलभ प्रवेश सुनिश्चित करणे.

नोकरदार महिला आणि विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, परवडणाऱ्या आणि दर्जेदार घरांची उपलब्धता सुनिश्चित करणे.

शाश्वत : गृहनिर्माण बांधकामादरम्यान पर्यावरणपूरक आणि टिकाऊ पद्धतींचा वापर सुनिश्चित करणे ऊर्जा कार्यक्षमता, नूतनीकरणक्षम ऊर्जा एकत्रीकरण, जलसंधारण, शाश्वत व पुनर्प्रक्रिया केलेल्या सामग्रीचा वापर, कार्यक्षम जागेचे नियोजन यास प्रोत्साहन.

हरित इमारत मानकांचा समावेश आणि हरित इमारत प्रमाणपत्रांसाठी प्रोत्साहन देणे.

पुनर्निर्माणशील : हवामान बदल विचारात घेऊन, पर्यावरणाचा ऱ्हास कमी करणारे, आपत्तींमुळे होणारी हानी मर्यादित करणारे आणि आपत्तीनंतर पुनर्निर्माण सुलभ करणारे गृहनिर्माण आवश्यक आहे.यात जमिनीचा सक्षम वापर, पर्यावरणपूरक इमारतींचे नियोजन, टिकाऊ बांधकाम साहित्य, पूररोधक व पूरनियंत्रण नियोजन, उष्मारोधक बांधकाम साहित्य, तंत्र व तंत्रज्ञान यांचा समावेश होतो.

३. धोरणात्मक उपाय धोरणात्मक उपायांमध्ये अनेक पैलूंचा समावेश आहे:

अ. डेटा–आधारित निर्णय–गृहनिर्माण गरज व मागणी सर्वेक्षण: राज्य सरकार संपूर्ण राज्यभर गृहनिर्माण गरजेचे मूल्यांकन करण्यासाठी व्यापक सर्वेक्षण राबवणार आहे, जे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे प्रत्येक जिल्हा–निहाय गृहनिर्माण गरज समजून घेण्यास मदत होईल.

राज्यस्तरीय गृहनिर्माण माहिती पोर्टलची निर्मिती: गृहनिर्माण क्षेत्रासाठी डेटा–आधारित धोरण आणि निर्णय प्रक्रिया राबवण्यासाठी राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल विकसित करणे प्रस्तावित आहे. यात मागणी आणि पुरवठा दोन्ही बाजूंनी डेटा संकलित करून विश्लेषण केले जाईल. हे पोर्टल जिल्हास्तरीय भूमी निधी कोष आणि विविध योजनांची माहिती उपलब्ध करून देईल, ज्यामुळे पारदर्शकता आणि गतिशीलता वाढेल.

निवासी वापरासाठी योग्य शासकीय जमिनींची भूमी निधी कोष आधारसामग्री तयार करणे: सार्वजनिक प्राधिकरणांद्वारे गृहनिर्माण करताना उपलब्ध शासकीय/निमशासकीय प्राधिकरणांच्या जमिनींची माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध झाल्यास गृहनिर्माण योजनांचे नियोजन सुलभ होते. यासाठी राज्यव्यापी सर्वेक्षण करून भूमी निधी कोष तयार करण्याचे उद्दिष्ट ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करायचे आहे.

ब. परवडणाऱ्या गृहनिर्माण साठ्याची निर्मिती – राज्याने २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक (एथड) आणि अल्प उत्पन्न गट (डखऋ) यांच्यासाठी ३५ लाख घरे बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे, ज्यासाठी ७०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. पुढील १० वर्षांत ५० लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे.

नवीन गृहनिर्माण :

सर्वसमावेशक गृहनिर्माण : १० लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महापालिका हद्दीतील ४००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राच्या भूखंडावरील प्रकल्पांमध्ये किमान २०% बांधकाम क्षेत्र म्हाडाकडे वितरण करणे अनिवार्य आहे. शासनाने सर्वसमावेशक गृहनिर्माणांतर्गत किमान ५ लाख घरांच्या निर्मितीचे लक्ष्य ठेवले आहे.

औद्योगिक कामगारांसाठी गृहनिर्माण: कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणाजवळ सुरक्षित, परवडणारी घरे उपलब्ध होणे आवश्यक आहे, त्यामुळे प्रवासाचा खर्च वाचेल आणि उत्पन्नात वाढ होईल. वॉक टू वर्क संकल्पनेनुसार, एमआयडीसी क्षेत्रात १०% ते ३०% जमीन गृहनिर्माणासाठी राखीव ठेवण्यात यावी.

ज्येष्ठ नागरिकांसाठी गृहनिर्माण: सन २०३६ पर्यंत महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या १७% पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ज्येष्ठ नागरिक गृहनिर्माणाला इमारतीच्या वापरासाठी एक स्वतंत्र प्रवर्ग म्हणून ओळखले जाईल. या प्रकल्पांसाठी विविध प्रोत्साहन दिले जातील. (क्रमश:)

**–नंदकुमार बलभीम वाघमारे**
**सहाय्यक संचालक (माहिती),**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई**

## बदलते तंत्रज्ञान

# भारतात बनतोय जगातील पहिला ड्युअल स्टेल्थ ड्रोन

शत्रूचे रडार आणि इन्फ्रारेड सिग्नल दोन्ही पकडू शकणार नाहीत.भारत जगातील पहिला ड्युअल स्टेल्थ ड्रोन बनवत आहे, जो केवळ शत्रूच्या हाय–रेझोल्यूशन रडार आणि इन्फ्रारेड सिग्नलपासून बचाव करणार नाही, तर काही सेकंदात हल्ला करण्यास देखील सक्षम असेल.



या ड्रोनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'रडार ॲब्सॉर्प्शन अँड मल्टीस्पेक्ट्रल ॲडॉप्टिव्ह' तंत्रज्ञान .हे एक विशेष स्वदेशी कोटिंग मटेरियल आहे, जे रडार आणि इन्फ्रारेड डिटेक्शन ९७% कमी करते. यामुळे ड्रोन शत्रूच्या रडार आणि इन्फ्रारेड सिग्नलपासून पूर्णपणे लपू शकतो. सध्या, फक्त अमेरिका, चीन आणि रशियाकडेच रडारपासून लपणारे स्टेल्थ ड्रोन आहेत.

या तंत्रज्ञानावर आधारित ड्रोनला **रामा** असे नावही देण्यात आले आहे. या ड्रोनचे वजन १०० किलो आहे आणि ते ५० किलोपर्यंत वजन वाहून नेऊ शकते. रामासह हे ड्रोन २०२५ च्या अखेरीस नौदलाकडे सोपवले जाऊ शकते.

हैदराबादस्थित स्टार्टअप कंपनी वीरा डायनॅमिक्स आणि बिनफोर्ड रिसर्च लॅब हे ड्रोन विकसित करत आहे. ड्रोन तयार करण्यासाठी वीरा डायनॅमिक्सने त्यांचे रामा वापरले आहे आणि बिनफोर्ड लॅब्सने त्यांचे स्वायत्त ड्रोन तंत्रज्ञान त्यात समाविष्ट केले आहे.

वीरा डायनॅमिक्सच्या सीईओ साई तेजा पेद्दिनेनी म्हणाल्या की, २०२२ मध्ये नौदलाच्या समस्या विधानाने हा प्रकल्प सुरू झाला. नौदलाला असे तंत्रज्ञान हवे होते जे इन्फ्रारेड स्टेल्थ प्रदान करू शकेल, म्हणजेच ड्रोनला थर्मल सेन्सर्सपासून संरक्षण देऊ शकेल.

वीराने बिनफोर्ड लॅब्सशी हातमिळवणी केली आहे, जी आधीच भारतीय सैन्यासाठी स्वायत्त ड्रोन बनवते. बिनफोर्डचे ड्रोन जीपीएस आणि रेडिओ फ्रिक्वेन्सी मुक्त वातावरणात देखील ऑपरेट करू शकतात. रडार आणि इन्फ्रारेडही त्याला पकडू शकत नाही: रडार ॲब्सॉर्प्शन आणि मल्टीस्पेक्ट्रल ॲडॉप्टिव्ह कोटिंगमुळे, हे ड्रोन शत्रूच्या रडार आणि थर्मल सेन्सर्सना चकमा देऊ शकते.उच्च–जोखीम मोहिमांसाठी डिझाइन केलेले: हे ड्रोन हेरगिरी, लक्ष्यित हल्ले किंवा पाळत ठेवणे यासारख्या उच्च–जोखीम असलेल्या भागात गुप्त ऑपरेशन्ससाठी डिझाइन केलेले आहे

# कथाकार, कादंबरीकार श्री.ज. जोशी

## निमित्त



पुण्यात १ ऑगस्ट १९१५ रोजी जन्मलेले श्रीकृष्ण जनार्दन जोशी हे लोकप्रिय, सिद्धहस्त लेखक आणि अस्सल पिढीजात पुणेकर! १२५ वर्षांपासून त्यांचे घराणे पुण्यात सदाशिव आणि नारायण पेठेत वास्तव्य करून असलेलं. त्यामुळे आधी वडिलांकडून जुन्या पुण्याच्या गमतीदार हकीकती त्यांनी ऐकल्या होत्या.

समाजाचे परिवर्तन आधी वडिलांकडून ऐकून आणि पुढे स्वतः प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे 'श्रीजं'कडे भरपूर किस्से जमा झाले होते, तशात गोष्टीवेल्हाळपणा वारशानेच चालत आलेला. त्यामुळे 'श्रीजं'नी तो गोष्टीरूपाने उतरवला नसता तरच नवल!

मराठी साहित्यामध्ये अनेक नररत्नांनी आपले योगदान दिले आणि साहित्य क्षेत्र समृद्ध केले. यामध्ये लेखकांनी वेगवेगळे साहित्य प्रकार हाताळत साहित्याची निर्मिती केली. यामध्ये श्रीकृष्ण जोशी यांचंही नाव येते. त्यांनी वेगळ्या पद्धतीने लेखन केले.

'श्रीजं' हे मुंबई विद्यापीठातून बीए (१९३८) झाले. त्यांनी डिफेन्स अकाऊंटस् विभागात नोकरी केली. सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात गोविंदराव तळवलकरांनी 'मी पुण्याहून लिहितो की...' अशी एक लेखमालाच त्यांच्याकडून वर्षभर लिहून घेतली होती. 'श्रीजं'च्या लहानपणी 'सिटी पोस्टापलीकडे पुणे नाही आणि पुण्यापलीकडे महाराष्ट्र नाही' असं म्हटलं जाई. त्यामुळे अंगात पुण्याबद्दलचा जाज्वल्य अभिमान असलेल्या 'श्रीजं'नी पुण्याबद्दल अत्यंत आपुलकीनं आणि प्रेमानं भरपूर लेखन केलं आहे.

त्यांचं लेखन अत्यंत ताजं आणि टवटवीत असतं. 'पुण्यात दुमजली बस येते', 'हुजूरपागेच्या मुली', 'ओंकारेश्वर ओंकारेश्वरी गेले',' पीएमटी एक संकीर्तन', 'सदाशिव पेठ साहित्यपेठ' अशांसारखी त्यांच्या लेखांची शीर्षकंही पुणेकरांना जवळची असत. पांढरपेशा समाजामध्ये गेल्या शंभर–दीडशे वर्षांत झालेले परिवर्तन त्यांच्या बहुतेक कथांमधून त्यांनी अत्यंत लालित्यपूर्ण भाषेत केले आहे.

'आनंदी गोपाळ' आणि 'रघुनाथाची बखर' या त्यांच्या अत्यंत गाजलेल्या कादंबऱ्या! पुणेरी, भरती ओहोटी, जोशीपुराण, माझ्या साहित्याचा बॅलन्सशीट, श्रीकृष्णकथा भाग एक ते सहा, स्थावर, वृत्तांत, सुचले... लिहिले, सुलभा, ऐलमा पैलमा, ओलेता दिवस, सुलभा, सूर्यापोटी, मामाचा वाडा अशी त्यांची ५०हून अधिक पुस्तके प्रसिद्ध आहेत.

कनिष्ठ मध्यमवर्ग हा त्यांच्या लेखनाचा गाभा होता. चाहत्यांना त्यांचे लिखाण आवडले. 'आनंदीगोपाळ' या कादंबरीने चरित्रात्मक कादंबरीचा प्रवाह मराठीत आणला. त्यांच्या 'यात्रा' या कादंबरीवरून 'साळसूद' नावाची दूरदर्शन मालिका प्रसारित करण्यात आली.

'रघुनाथाची बखर' या कादंबरीवरून 'व्यासपर्व' हा चित्रपट तयार झाला. आनंदी गोपाळ या कादंबरीला राज्य शासनाचा ह.ना. आपटे पुरस्कार व अन्य काही पुरस्कारही मिळाले. १३ जानेवारी १९८९ रोजी त्यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# गरोदरपणात सर्दी, खोकला झाल्यास काय करावं?

आजीबाईंचा बटवा हे तुम्ही आजवर अनेकदा ऐकलं असेल. आई–आजीच्या जुन्या युक्त्यांना आपण कधीच नाही म्हणणार नाही किंवा त्यावर अविश्वासही दाखवणार नाही, पण या हेल्थ हॅकबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी तज्ज्ञांशी संवाद साधला आणि हा घरगुती उपाय वा जुगाड गर्भवती महिलांसाठी सुरक्षित आहे की नाही हे शोधून काढले.



ओव्यामध्ये थायमॉल असते, ज्यामध्ये दाहकविरोधी आणि प्रतिजैविक गुणधर्म असतात. थायमॉल तुमचे नाक साफ करण्यास, घशाची जळजळ कमी करण्यास मदत करते. तर होय, ओवा गरम करून तो रुमालात घालून, त्याचा बटवा बनवून वास घेणे सर्दी आणि खोकल्याची लक्षणे कमी होण्यास मदत होते, असे पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांनी सांगितले आहे.

आयुर्वेदिकतज्ज्ञ डॉ. अंशु वात्स्यायन म्हणाले की, हा ओव्याचा बटवा शरीर व डोकेदुखी बरं करू शकते. बाळंतपणानंतर हा उपाय महिलांसाठी अधिक फायदेशीर ठरू शकतो. हा बटवा तयार करण्यासाठी तुम्ही ओव्याच्या बिया तव्यावर भाजून किंवा कोमट पाण्यात भिजवून घेऊ शकता. बटवा बनवण्यासाठी ओवा अर्धा चमचापेक्षा जास्त घेऊ नका, अशी त्यांनी शिफारस केली आहे.

आयुर्वेदिकतज्ज्ञ डॉ. अंशु वात्स्यायन आणि पोषणतज्ज्ञ ईशा लाल या दोघांनीही मान्य केले की, ओव्याचा बटवा गर्भवती महिलांसाठी सुरक्षित आहे. जर तुम्हाला गर्भधारणेदरम्यान इंग्रजी औषधे खायची नसतील आणि त्याचे दुष्परिणाम सहन करायचे नसतील, तर ओव्याचा बटवा तुम्हाला ठराविक औषधांशी संबंधित होणाऱ्या दुष्परिणामांपासून आराम देईल, पण तुम्हाला खात्री नसल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे, त्यांच्याकडून तपासून घेणे केव्हाही उत्तम ठरेल, असे पोषणतज्ज्ञ ईशा लाल म्हणाल्या आहेत.

पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांनी सांगितले की, गर्भवती महिला आठवड्यातून दोन किंवा तीन वेळा सुरक्षितपणे ओव्याचा बटवा वापरू शकतात, पण अस्वस्थता टाळण्यासाठी अतिवापर करणे टाळा, असेही त्या पुढे म्हणाल्या आहेत. त्यामुळे गर्भवती महिलांनी आवश्यकतेनुसार कार्यवाही करावी.

# आजपासून जिल्ह्यात महसूल सप्ताह

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महसूल विभागाच्या वतीने राज्यात एक ऑगस्ट रोजी 'महसूल दिन 'साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा सप्ताह शुक्रवार (दि.१) ते गुरुवार (दि. ७ ऑगस्ट) दरम्यान असणार आहे. या सप्ताह अंतर्गत विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

महसूल सप्ताह

१ ऑगस्ट रोजी 'महसूल दिना'निमित्त उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आणि निवृत्त महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार होईल. याच दिवशी विविध प्रमाणपत्रांचे वाटपही मान्यवरांच्या हस्ते केले जाईल.

२ ऑगस्ट : अतिक्रमण नियमानुकूल करणार ३१ डिसेंबर २०११ पूर्वी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून राहणाऱ्या पात्र नागरिकांना त्यांच्या घरांचे पट्टे वाटप केले जाणार आहेत.

३ ऑगस्ट : शेत रस्त्यांचे वाद मिटवणार 'पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजना' अंतर्गत पाणंद आणि शिवपांदण रस्त्यांवरील वाद मिटवण्यासाठी तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी स्तरावर दोन अपीलनंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. प्रत्येक शेताला १२ फुटांचा रस्ता मिळेल आणि त्यांना क्रमांक दिले जातील. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण होईल, आणि झाडे तोडल्यास वनविभागाच्या कायद्यांतर्गत कारवाई होईल.

४ ऑगस्ट : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, महसूल मंडळ स्तरावर शिबिरांचे आयोजन होऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. आधार कार्ड, संजय गांधी योजना ओळखपत्र, अधिवास, जात, उत्पन्न आणि जात वैधता प्रमाणपत्रांचे वाटप होईल. वर्षातून चार वेळा अशी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.

५ ऑगस्ट : डिबिटी अडचणी दूर करणार-विशेष सहाय्य योजनेअंतर्गत डिबिटी न झालेल्या लाभार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी तलाठी घरोघरी भेटी देतील आणि आधार कार्ड बँकेशी लिंक करण्याची प्रक्रिया पूर्ण करतील.

६ ऑगस्ट : शर्तभंग जमिनी परत घेणार- शासकीय जमिनींच्या शर्तभंग प्रकरणांचे सर्वेक्षण होऊन अतिक्रमण किंवा शर्तभंग आढळल्यास त्या जमिनी शासनाकडे परत घेतल्या जाणार आहेत.

७ ऑगस्ट : एम सँड धोरण आणि सांगता समारंभ -कृत्रिम वाळू (M-Sand) धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यशाळा आणि शिबिरांचे आयोजन होईल. १७ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मानक कार्यप्रणाली (SOP) अवलंबली जाईल. महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ आयोजित होऊन उल्लेखनीय कामगिरीची दखल घेतली जाईल.

# आमदार रविशेठ पाटील यांनी केली भाईसाहेब टके यांच्या तब्येतीची विचारपूस

**नागोठणे : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागातील नेते भाईसाहेब टके हे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी मातेच्या दर्शनासाठी गेले होते त्यावेळी मंदिर प्रांगणात पाय घसरून पडल्यामुळे त्यांना दुखापत झाली होती. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना चार महिने बेड रेस्ट घेणे आवश्यक असल्यामुळे ते आपल्या निवासस्थानी विश्रांती घेत असल्याचे कळल्यानंतर पेण सुधागड मतदार संघांचे आमदार रविशेठ पाटील यांनी भाईसाहेब टके यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन त्यांच्या



तब्येतीची विचारपूस केली.

त्यावेळी आमदार रविशेठ पाटील यांच्या समवेत नागोठणे ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, भाजप नेते मारुती देवरे, भाजप रोहा ता. अध्यक्ष महेश ठाकूर, प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष सिराजभाई पानसरे, पळस ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मारुती शिर्के, संतोष लाड, असिफ मुल्ला, बंटी मांडे, तिरत पोलसानी, भरत गिजे, अल्वीन नाकते, तात्या पोत्रिक, निलेश म्हात्रे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'पोस्को'तर्फे रा.जि.प. भागाड आणि भादाव शाळांचे नूतनीकरण

**माणगाव : बातमीदार**

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने दि. ३० जुलै रोजी आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत राबवलेल्या एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा भाग म्हणून माणगांव नगरपंचायत हद्दीतील रा.जि.प. शाळा भादाव आणि विळे-भागाड परिसरातील रा.जि.प. केंद्र शाळा भागाड या दोन शाळांचे नूतनीकरण केलेल्या इमारतींचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पाडला.

कंपनीने शिक्षण क्षेत्रातील आपल्या बांधिलकीची पुन्हा एकदा पुष्टी केली आहे, ज्याचा थेट फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होत आहे. या कार्यक्रमासाठी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक वू सुक चोई, प्रशासन विभाग प्रमुख महेंद्र तट्टे यांच्यासह स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने नारळ वाढवून आणि दीपप्रज्वलन करून शाळांचे उद्घाटन करण्यात आले.

भादाव येथील शाळेच्या दुरुस्तीमध्ये संपूर्ण इमारतीचे आकर्षक रंगकाम, जुन्या आणि खराब झालेल्या खिडक्यांची दुरुस्ती, शौचालयाकडे जाणारा रस्ता तसेच इतर छोट्या-मोठ्या दुरुस्तीच्या कामांचा समावेश होता.




# रेल्वेच्या माध्यमातून दोन श्रद्धास्थळांना जोडण्याचा उपक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे भक्तांसाठी खास साईनगर शिर्डी आणि तिरुपती दरम्यान १८ विशेष सेवा चालवणार आहे . या ट्रेनमुळे दोन महत्त्वाच्या धार्मिक स्थळांमध्ये थेट जोडणी होणार असून, श्री साईबाबा आणि श्री वेंकटेश्वर स्वामींच्या दर्शनाची संधी निर्माण होणार आहे.

चालविण्यात येणाऱ्या गाड्यांमध्ये साईनगर शिर्डी - तिरुपती साप्ताहिक विशेष ट्रेन (१८ सेवा) ट्रेन क्र. ०७६३८ साप्ताहिक विशेष दर सोमवारी ०४.०८.२०२५ ते २९.०९.२०२५ या कालावधीत १९.३५ वाजता साईनगर शिर्डी येथून प्रस्थान करेल आणि तिसऱ्या दिवशी ०१.३० वाजता तिरुपती येथे पोहोचेल. (एकूण ९ सेवा)ट्रेन क्र. ०७६३७ साप्ताहिक विशेष दर रविवारी ०३.०८ते २८.०९.२०२५ या कालावधीत ०४.०० वाजता तिरुपती येथून प्रस्थान करेल

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-अरिवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७/२ | ०-११-३०<br>पो. ख. ०-००-८०<br>एकूण ०-१२-१०<br>**पैकी ०-०८-७०** | १.३६ | **पुष्पा गजानन घरत<br>लक्ष्मीबाई बाळाराम लखांबले<br>सुभाष बाळाराम लखांबले<br>गुलाब अनंता पाटील<br>सुनंदा सुरेश दिसले** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ३१/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-अरिवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७/१ | ०-१३-००<br>पो. ख. ०-०१-७०<br>एकूण ०-१४-७०<br>**पैकी ०-०७-३०** | १.०० | **लक्ष्मीबाई बाळाराम लखांबले<br>सुभाष बाळाराम लखांबले<br>गुलाब अनंता पाटील<br>सुनंदा सुरेश दिसले<br>पुष्पा गजानन घरत** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ३१/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१



## जाहिर निविदा

**मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या. साठी नमूद सेवा सुविधांच्या निवीदा मागविण्यात येत आहेत.**

| निविदा क्र. | निविदा तपशिल | निविदा सादर करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| निविदा १ | संस्थेच्या संकुल परिसरात १८ सुरक्षा रक्षक आणि २ पर्यवेक्षक अधिकारी. १२ तासांचे २ शिफ्ट् | दि.०५.०८.२०२५ पर्यंत | सोसायटी कार्यालय, मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या., भुखंड क्र. ०१, सेक्टर-२२, फेज-२, तळोजा, ता. पनवेल, नवी मुंबई. |
| निविदा २ | सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी सर्वसामावेशक संगणकीय प्रणाली.<br>- सोसायटी मेंन्टेनन्स मॅनेजमेंट प्रणाली सॉफटवेअर.<br>- सोसायटी नोटीस अॅन्ड इन्व्हाईस मॅनेजमेंट<br>- सोसायटी स्टाफ अटेंडन्स प्रणाली | | |
| निविदा ३ | संस्थेचे इन व आउट गेट्स ऑटोमेटेड स्मार्ट बूम बॅरिअर प्रणाली. | | |

**सही/-**
**सचिव**
**विजय पाटील**
**मारवा सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या.**
**पत्ता : - भुखंड क्र.०१, सेक्टर-२२, फेज-२, तळोजा, ता. पनवेल, नवी मुंबई.**


# खालापुरातून एक जण बेपत्ता

**चौक : प्रतिनिधी**

जितेंद्र जनार्दन पालांडे हे २५ जुलै २०२५ रोजी दुपारी घरातून पोटात दुखःत असल्याने डोलवली येथे डॉक्टरकडे जातो असे सांगुन मोटार सायकल घेउन घरातुन गेले, ते परत घरी आले नसल्याने फिर्यादी वेदांत यांनी दिली.

दिनांक २६ जुलै रोजी घोडीवली येथील पुलाच्या खाली नदीमध्ये मोटार सायकल सापडली, मात्र परिसरात, आजुबाजुला तसेच पाताळगंगा नदीत शोध घेतला असता कोठे शोध घेतला असता ते जिवंत अथवा मयत सापडले नाहीत.

जितेंद्र जनार्दन पालांडे वय-५२ वर्षे, हे ५ फुट ११ इंच उंचीचे असून रंग-सावळा, केस काळे, पांढरे, चेहरा-लांबट, नाक-सरळ, अगांने सडपातळ, डोळे साधारण, अंगात पांढ-या रंगाचा शर्ट व त्याचे मध्ये पिंवळया लाईन व राखाडी रंगाची फुल पॅन्ट, गळयात काही नाही, पायात चॉकलेटी रंगाची चप्पल असा पेहराव परिधान केलेला आहे. कोणाला आढळल्यास तपासिंक अंमलदार मो. नं. ८८०५३९५०९०, खालापुर पो. ठाणे ०२१९२२७५०३३ येथे संपर्क साधावा असे आवाहन खालापूर पोलिसांनी केले आहे.




सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र / करारनामा)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| १ | खारघर ४३९ | खारघर ६०५ | ४४४/२अ<br>४४४/२ब<br>४४५/२अ<br>४४५/२ब<br>४४५/२क<br>४४५/२ड | ०-१८-२<br>०-१३-१<br>०-१६-०<br>०-४४-७<br>०-२८-४<br>०-४४-२ | १४५० चौ.मी. पात्रता मंजूर असून पैकी ११५० चौ.मी. वाटपित होऊन उर्वरीत ३०० चौ.मी. इरादित पात्रता | भूखंड क्र.६८A, सेक्टर-३५E, क्षेत्र - ३०० चौ.मी. | १. श्री.मनोहर हासुराम म्हात्रे<br>२. कुमारी.पायल भालचंद्र म्हात्रे (अज्ञान पालनकर्ता काका श्री.मनोहर हासुराम म्हात्रे<br>३. एकनाथ हासुराम म्हात्रे<br>४. नामदेव हासुराम म्हात्रे | - |
| | | | एकूण क्षेत्र | १-६४-६ | | | | |
| २ | खारघर १२१ | खारघर ३६९ | १५५/१९<br>१/३<br>५/२+३<br>५/५+६<br>५/८+९<br>३३४/५<br>१०/३<br>११/५<br>१४/४<br>११/३<br>१७/५<br>१२९/० | ०-०४-०<br>०-१०-७<br>०-१२-०<br>०-४६-६<br>०-११-४<br>०-२०-०<br>०-३३-०<br>०-१४-०<br>०-४१-२<br>०-०४-३<br>०-१७-०<br>०-५९-७ | २९०० चौ.मी. पैकी ५०० चौ.मी | भुखंड क्र.१५०A, सेक्टर-१३, क्षेत्र ४९३.४२ चौ.मी. | १. हिरा जानू तोडकर<br>२. श्री.शत्रूघ्न जानू तोडकर | मा. दिवाणी न्यायाधीश क्र. स्तर दावा क्र. स्पे.मु.क्र.८१८/२०१२ मधील तडजोड पुरशीसनुसार |
| ३ | | ९०C | १९७/२ब | ०-२३-७ | | | | |
| ४ | | ३९, | २/४+६ +९/१ | ०-२१-५ | | | | |
| ५ | | १८७ | १२३/२५ | ०-०९-७ | | | | |
| | | **एकूण संपादित क्षेत्र** | | **३-२९-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२०१/२०२५-२६



## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**कार्यालय : उपायुक्त मुख्यालय, १ ला मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१० २०६,** दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id: panvelcorporation@gmail.com Website: www.panvelcorporation.com

## जाहिर सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना जाहिर सूचना देण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांर्तगत सर्व मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व मालमत्ता धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ५५ अन्वये ऑनलाईन पध्दतीने व प्रत्यक्ष मालमत्ता कराची देयके बजावणेत येत आहेत.

तथापि, महानगरपालिका क्षेत्रातील सन २०२५ -२०२६ आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके तयार (जनरेट) करणेत आलेली आहेत. ज्या मालमत्ता धारकांना अद्यापपर्यंत मालमत्ता कराची देयके प्राप्त झालेली नाहीत, त्या मालमत्ता धारकांनी panvelmc.org किंवा PMC TAX APP वर नोंदणी करुन ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घ्यावीत. तसेच, ज्या मालमत्ता धारकांना ऑनलाईन पध्दतीचा वापर करुन मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घेणे शक्य नाही अशा मालमत्ता धारकांनी मुख्यालयात किंवा संबंधित प्रभाग कार्यालयामधून देयके उपलब्ध करुन घ्यावीत. सदर प्रमाणे कार्यवाही न झाल्यास ऑनलाईन प्रसिध्दी दिनांकापासून देयके बजावण्यात आलेली आहेत असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच, दिनांक ३१/०७/२०२५ पर्यंत चालू वर्षाचा एकरक्कमी मालमत्ता कर भरणा केल्यास चालू मागणीवर ५% देण्यात आलेली सुट दिनांक ३१/०८/२०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तसेच, मालमत्ता कराचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यास अतिरिक्त २% सुट देण्यात येते.

सर्व मालमत्ता धारकांनी आपली देयके ऑनलाईन किंवा ऑफलाईन व्दारे प्राप्त करुन घेऊन मालमत्ता कराचा भरणा लवकरात लवकर करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. ३७३/३८२/२०२५**
**दिनांक :- ३१/०७/२०२५**

**सही /-**
**(स्वरुप खारगे)**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपलिका**

## निवडक

### पायी जाणाऱ्या व्यक्तीस लुटले

**पनवेल :** शहरातील पनवेल रेल्वे स्टेशन ते एस.टी.डेपोकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका व्यक्तीस अज्ञात चोरट्याने लुटून त्याच्याकडील रोख रक्कम सह मोबाईल फोन काढून घेतल्याची घटना घडली आहे. मुकेश चेढा (५१ रा.पनवेल) हा पनवेल शहरातील पनवेल रेल्वे स्टेशन ते एस.टी.डेपोकडे जाणाऱ्या रस्त्यावरून पायी येत असताना अज्ञात व्यक्ती त्याच्याजवळ आला व त्याला गांजा आहे का? असे विचारण्याच्या बहाण्याने त्याचे खिसे चाचपडून त्याच्या खिशात असलेला मोबाईल फोन व रोख रक्कम असा मिळून जवळपास साडे नऊ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरला तसेच खिशातील वस्तारा काढून त्याच्या डाव्या डोळ्याच्या बाजूला मनगटावर आणि नाकावर वार करून तो पसार झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### भरत जाधवांच्या मागणीला यश

**पनवेल :** तहसील कार्यालयातील संजय गांधी योजनेचे कार्यालय दुसऱ्या मजल्यावर होते. हे कार्यालय खाली आणण्यासाठीचे निवेदन शिवसेनेचे तालुकाप्रमुख भरत जाधव यांनी दिले होते. त्यांच्या या मागणीला यश आले असून संजय गांधी योजनेचे कार्यालय तळमजल्यावर आणण्यात आले आहे. संजय गांधी योजनेचे कार्यालय पनवेल शहरातील तहसील कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावर होते. त्यामुळे या योजनेतील ज्येष्ठ नागरिक, वृद्ध महिला तसेच दूरवरून येणाऱ्या योजनेतील लाभार्थ्यांना वर चढणे जिकिरीचे झाले होते. याबाबत भरत जाधव यांनी तहसीलदारांना हे कार्यालय खाली घेण्यासाठी निवेदन दिले होते. त्यानुसार हे कार्यालय तळमजल्यावर पुरवठा शाखेच्या बाजूला आणण्यात आले.

### बेलापुरमध्ये देशी झाडांची लागवड

**नवी मुंबई :** महानगर पालिकेच्या वतीने व अनुलोम मित्रांच्या



सहकार्याने ठाणे विभागातील बेलापूर भागात आज दुर्गा माता नगर सेक्टर ८ सीबीडी बेलापूर या ठिकाणी जांभूळ या वृक्षाची २५ झाडे येथील उद्यानात लावण्यात आली. पुढील तीन वर्ष या रोपांची निगा राखली जाणार आहे. या वेळी अनुलोमचे ३५ अनुलोम मित्र व कोकण विभाग संवादिनी नीला दामले, उपविभाग जनसेवक रामनाथ म्हात्रे, बेलापूर भाग जनसेवक सुरेश सिंह राणा व ऐरोली भाग जनसेवक संजय पोकळे तसेच पालिकेचे उपायुक्त किसनराव पलांडे, उज्वला जगताप, सोनाली बनकर तसेच इतर उपस्थित होते.

# बेलापूर, ऐरोलीमध्ये अतिक्रमण तोडले

**नवी मुंबई : बातमीदार**





नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात व ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

घर नं. ०५७४, से. १९/ इ फणसपाडा बेलापूर नवी मुंबई , घर नं.६७३/३, से. १९, शहाबाज गांव यांचे अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत एमआरटीपी कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते. अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करून सदर अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत घर क्र- पी-८७, से-०४, ऐरोली, नवी मुंबई व घर क्र- पी-१००, से-०४, ऐरोली, नवी मुंबई येथे बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अनधिकृतपणे बांधकाम सुरू केले होते. दिगंबर वाघमारे, घर क्र पी-८७, से-०४, ऐरोली, नवी मुंबई. व अजय के. बनकर, घर क्र पी-१००, सेक्टर ०४, ऐरोली, नवी मुंबई यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामास जी विभाग कार्यालयामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. परवानगी व्यतिरिक्त करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले. तसेच सदर कारवाई अंतर्गत सदर बांधकाम धारकाकडून रूपये ५० हजार प्रमाणे दंडात्मक शुल्क वसूल करण्यात आले आहे.

## सोसायट्यांना कचरा डब्यांचे वितरण



**नवी मुंबई: प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका वैजयंती भगत व रुपाली भगत यांनी आपल्या सानपाडा विभागातील सोनखार-पामबीच येथील सेक्टर १, १३ ते १९ या परिसरातील सर्वच गृहनिर्माण सोसायट्यांना कचरा उचलण्यासाठी ओला व सुका कचऱ्याच्या डब्याचे वितरण मागील तीन दिवसांत करण्यात आले आहे.

सोसायट्यांना ओला आणि सुका कचऱ्याचे वर्गीकरण करता यावे यासाठी डब्बे उपलब्ध व्हावे म्हणून माजी नगरसेविका वैजयंती भगत व रुपाली भगत यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त आणि घनकचरा विभागाचे उपायुक्त यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर महापालिकेने ओला व सुका कचरा वर्गीकरण करण्याची प्रकिया अधिक सुलभ होऊन प्रभागांमध्ये स्वच्छता नांदावी या हेतूने हिरव्या व निळ्या रंगाचे मोठ्या आकाराचे डब्बे उपलब्ध करून दिले आहेत. सदर डब्यांचे वितरण सोनखार-पामबीच विभागातील सोसायटी पदाधिकारी व रहिवासी यांना दोन्ही नगरसेविका यांनी सोसायटी निहाय जाऊन वितरित केले आहेत.

टप्प्याटप्प्याने डब्यांचे वितरण करण्यात येणार असून अधिक माहितीसाठी नगरसेविका जनसंपर्क कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जे.एस.एस. रायगडतर्फे स्वच्छता जनजागृती स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जन शिक्षण संस्थान (जेएसएस) रायगडच्या माध्यमातून मंगळवारी कामोठे-पनवेल व माणगाव येथे स्वच्छतेवर आधारित पोस्टर मेकिंग व घोष वाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आणि सार्वजनिक स्वच्छता व प्लास्टिक बंदी जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे व भाग्यश्री पुसाळकर यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगड च्या माध्यमातून १६ ते ३१ जुलै या १५ दिवसांच्या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येणार आहेत अशी माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली आहे. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्ष पासून सक्रियपणे सुरू आहे व आता पर्यंत ७० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे.

कामोठे-पनवेल व माणगाव ह्या ठिकाणी स्वच्छतेवर आधारित पोस्टर मेकिंग व घोष वाक्य स्पर्धांचे आयोजन आणि सार्वजनिक स्वच्छता व प्लास्टिक बंदी जनजागृती या उपक्रमावेळी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, भाग्यश्री पुसाळकर, प्रशिक्षिका स्नेहा राणे, शैला म्हात्रे, सीमा पाटील, सुवर्णा पाटील व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## डॉक्टर श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे पोलिसांना बॅरिकेट्स



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉक्टर श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने पनवेल पोलिसांना बॅरिकेट्स देऊन मदतीचा हात दिला आहे. प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे वाहतूक व्यवस्थापनात पोलिसांना मोठी मदत होणार आहे.

दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने गुरुवारी (दि.३१) पनवेल पोलिसांना बॅरिकेट्स दिले. उपयुक्त कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला परीमंडळ चे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले भाऊसाहेब ढोले यांच्यासह प्रतिष्ठानचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी भाऊसाहेब ढोले यांनी प्रतिष्ठानचे आभार मानले. तसेच या बॅरिकेट्समुळे पनवेल शहरातील वाहतूक कोंडी नियंत्रणात आणण्यासाठी मोठी मदत होईल. शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस नेहमीच प्रयत्नशील असतात आणि अशा प्रकारच्या सामाजिक उपक्रमातून मिळणारी मदत पोलिसांचे काम अधिक सोपे करते, असे सांगितले.

## अण्णा भाऊ साठे यांना आज अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीदिनानिमित्त शुक्रवारी (दि.१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेक्टर १५ ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये 'विचारवेध' या व्याख्यान शृंखलेंतर्गत साहित्यिक डॉ. रणधीर शिंदे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

कोल्हापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख असणारे डॉ.रणधीर शिंदे विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे समन्वयक देखील आहेत. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना वैचारिक अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी सायं. ६.३० वा. मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

राम प्रहर

श्रावणधारा

### हिरवा निसर्ग...

श्रावणातील निसर्ग
हिरवा.. हिरवा..!
फुलून जाते सौंदर्य
सुंदर दिसतो देखावा..
सृष्टीचे सौंदर्य
होते मनमोहक..!
हिरवे गालिचे
वाटतात मनोवेधक..
पक्ष्यांचे मंजुळ स्वर
कानी पडतात..!
वातावरणात जणू
ते आनंद भरतात..
श्रावण बघावा सर्वत्र
वाटतो प्रसन्न प्रसन्न..!
आनंदी आनंदाने
भरतो चैतन्य चैतन्य..



-अनिल दाभाडे, रसायनी




# टोल नाक्यावर बोगस व्हीआयपी पासची विक्री

## खालापूर पोलिसांकडून आरोपी गजाआड



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात जणू काही झटपट पैसा कमविण्याची शर्यतच सुरू आहे. एका पाठोपाठ एक घटना समोर येत असून गोदरेज कंपनीच्या प्रकरणानंतर आता आयआरबी कंपनीमध्ये सुरक्षारक्षक म्हणून टेम्परीं स्वरूपात कार्यरत असणाऱ्या कामगाराने आयआरबी कंपनीचा फ्री टोल करण्यासाठी आयआरबी रोड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा व्हीआयपी पासेस विक्री केल्याचे समोर आल्याने या बाबत आयआरबी कंपनीच्या वतीने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती.

याबाबत जबाबानंतर पोलीस अधीक्षक रायगड आचल दलाल यांच्या आदेशानुसार खालापूर पोलिसांनी या आरोपीवर गुन्हा दाखल करून आरोपीला बेड्या ठोकल्या. ३० जुलै रोजी त्याला न्यायालयात हजर केले असता खालापूर न्यायालयाने अधिक तपासासाठी २ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या प्रकरणात मोठे माझे गळाला लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, खालापूर तालुक्यात सावरोली गावजवळ खालापूर टोल नाका आहे. या ठिकाणी स्थानिक कामगारांना सुरक्षारक्षक म्हणून नोकऱ्या दिल्या आहेत. यात सावरोली गावातील ओंकार रामचंद्र महाडिक याला त्याच्या वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या जागी घराचा उदरनिर्वाहच्या दृष्टीने आयआरबी कंपनीने ठेकेदारी पध्द्तीवर सुरक्षारक्षक म्हणून कामावर रुजू केले होते. नोकरी करीत असताना या टोल नाक्यावरून येजा करणाऱ्या रायगडसह पुणे मुंबई ठाणे येथील बड्या वाहनांच्या मालकांशी ओळख वाढल्याने त्याने झटपट पैसे कमविण्यासाठी शकल लढवली. आयआरबी रोड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा टोल फ्री साठी बोगस व्हीआयपी पास तयार करून मोठा आर्थिक व्यवहार करून अनेकांना विक्री केले. व्हीआयपी कार्ड अनेक टोल नाक्यावर दाखवून पैसे न देता प्रवास सुरू असल्याचे आय आर बी कंपनीच्या अधिकारी जयवंत नारायण देसले यांच्या लक्षात आल्याने, याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर खालापूर पोलिसांनी संशयित आरोपीचा जबाब नोंदविला, चौकशी सुरू असताना नव्याने रायगड जिल्ह्याचा पदभार घेणाऱ्या रायगड पोलीस अधीक्षक अचल दलाल यांनी याबाबत माहिती घेऊन तात्काळ खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना आरोपी ताब्यात घेऊन गुन्हा नोंद करून अटक करण्याचे आदेश दिले.

आरोपी ओंकार महाडिक याला २९ जुलै रोजी त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन गुन्हा नोंद करीत गजाआड करण्यात आले. त्याला ३० जुलै रोजी खालापूर न्यायालयात हजर केले असता २ ऑगस्टपर्यंत पोलीस कास्टडी सुनावली आहे.

# गणेश घाट दुरुस्तीचे आदेश



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील गणेश घाट क्रमांक एकची पाहणी कर्जत नगरपालिकेचे माजी नगरसेवक अ‍ॅड. संकेत भासे आणि कर्जत नगरपालिकेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी केली. पाहणीनंतर घाटाची झालेली दुरवस्था लक्षात घेऊन मुख्याधिकारी चव्हाण यांनी तत्काळ दुरुस्तीचे आदेश दिले.

या निर्णयामुळे आगामी गणेशोत्सवात भक्तांना अधिक सुरक्षित व स्वच्छ घाट उपलब्ध होणार असून कर्जतकरांचा गणेशोत्सव यावर्षी अधिक सुखमय आणि आनंददायी ठरणार आहे.

गणेश घाटाच्या पाहणीवेळी रमाकांत जाधव, योगेश पोथरकर, वैभव सुरावकर, प्रज्योत घोसाळकर, कर्जत शहर उपप्रमुख दिनेश कडू उपस्थित होते. मुख्याधिकारी चव्हाण यांनी तत्काळ दुरुस्तीचे आदेश दिल्याने लगेचच काम सुरू करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी गिरवले सर्प विज्ञानाचे धडे

**पाली : प्रतिनिधी**

नागपंचमी निमित्त सुएसोचे माध्यमिक विद्यालय वांगणी येथे सर्प विज्ञान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा समिती शाखा पाली-सुधागडच्या वतीने विद्यार्थ्यांना सापांबद्दल असलेले विविध गैरसमज व अंधश्रद्धा दुर करून शास्त्रशुद्ध माहिती देण्यात आली.



साप माणसाला गिळतो का? साप डूक धरतो का? सापाला नागमणी व केस असतात का? पुंगीच्या आवाजाने साप फणा कसा डोलावतो? साप दुध पितो का? साप चावल्यावर कोणती खबरदारी घ्यावी? सापांचे प्रकार कोणते? असे विविध प्रकारचे प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केले. पाली-सुधागड महा. अंनिस शाखेचे कार्याध्यक्ष व सर्पमित्र अमित निंबाळकर यांनी या सर्व प्रश्नांचे व शंकांचे शास्त्रशुद्धरित्या निरसन केले. त्यांनी सांगितले की पूर्ण वाढ झालेल्या माणसाचा खांदा रुंद असल्याने साप माणसाला गिळू शकत नाही. त्यामुळे सापाने माणसाला गिळले या बहुतांश अफवा असतात.

सापाच्या अंगावर केस किंवा नागमणी येत नाही. तसेच साप ठार बहिरा असल्याने गारुड्याने वाजविलेल्या पुंगीचा आवाज त्याला येत नाही. केवळ पुंगीच्या हालचालींकडे बघुन तो आपला फणा डोलवतो. सापाचा मेंदू छोटा असतो. त्यामुळे त्याची स्मरणशक्ती अतिशय अल्प असते. भक्ष पकडणे, संभोग करणे अशा काही प्राथमिक क्रियाच त्याला समजतात परिणामी साप कोणाचाही डुक धरू शकत नाही. या वेळी विषारी, निमविशारी व बिनविषारी सापांची चित्रे, माहिती व व्हिडीओ टॅबद्वारे दाखवून अधिक सखोल माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक महादेव साबळे, अंनिस कार्यकर्ते तुषार ठोंबरे व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान शिक्षक टिळक खाडे व सूत्रसंचालन शिक्षिका संस्कृती घरट यांनी केले.

दरम्यान, नागपंचमीनिमित्त अनेक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र ठेवण्यात आले होते.

# नागाव हायस्कूलमध्ये जागतिक युवा कौशल्य दिन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या मनातील करिअरविषयी असलेल्या संभ्रमाचे निरसन करून त्यांना योग्य दिशा देण्यासाठी माय भारत - अलिबाग-रायगड आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने नागाव हायस्कूल येथे जागतिक युवा कौशल्य दिन २०२५ चा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी व नवोन्मेषी पद्धतीने राबविण्यात आला.



या उपक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी करिअर स्वमूल्यमापन आणि प्रत्यक्ष तज्ज्ञांशी संवाद अशा दुहेरी स्वरूपाचा अनुभव एकाच वेळी उपलब्ध करून देण्यात आला. कार्यक्रमाची संकल्पना ओएसिस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कोळी यांनी मांडली असून जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात माय करिअर पाथ ब्लूप्रिंट या स्वयंमूल्यमापन सत्राने झाली. या सत्रात विद्यार्थ्यांना विशेषतः तयार केलेल्या ओएमआर स्वरूपातील प्रश्नपत्रिकेवर आधारित ५० प्रश्न विचारण्यात आले. हे प्रश्न त्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडी, कौशल्ये आणि सामाजिक-आर्थिक वास्तव यावर आधारित होते. या उत्तरांच्या आधारे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या गरजेनुसार करिअर पर्यायांचा विचार सुरू केला.

सत्रानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या मूल्यांकनाच्या आधारे तयार केलेली व्यक्तिगतरित्या मुद्रित माहितीपत्रके देण्यात आली, ज्यामध्ये त्यांची करिअरविषयक प्रवृत्ती, शक्यता आणि पुढील पायऱ्यांविषयी दिशा सूचित करण्यात आली.

दुसऱ्या सत्रात करिअर पाथवे पॅनल डिस्कशन चे आयोजन करण्यात आले. या सत्रात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी प्रत्यक्ष संवादाद्वारे विद्यार्थ्यांचे प्रश्न मार्गदर्शनाच्या स्वरूपात सोडवले. पॅनलमध्ये जिल्हा युवा आयकॉन तपस्वी गोंधळी, स्पर्धा परीक्षा अकॅडमी संचालिका सुचिता साळवी, पत्रकार व हॉटेल व्यावसायिक हर्षल मोरे, आणि विधिज्ञ अ‍ॅड. रेखा राणे यांनी विद्यार्थ्यांशी त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून संवाद साधला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओएसिस संस्थेचे सहखजिनदार सार्थक गायकवाड, प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कोळी यांनी तर आभारप्रदर्शन नागाव हायस्कूलच्या सहाय्यक शिक्षिका जान्हवी बनकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनात नागाव शाळेचे संकुलप्रमुख अजित पाटील, स्वयंसेवक समन्वयक दर्श नागोटकर, स्वयंसेविका वेदांती महाडिक व तनुश्री सुतार यांनी विशेष सहकार्य केलेक

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

श्री गुरु लिंगेश्वर पब्लिक स्कूल या शाळेमध्ये विक्रम साबळे फाउंडेशन यांच्या मार्फत गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शाळेय शैक्षणिक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

या वेळी विक्रम साबळे फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम यशवंत साबळे युवा उद्योजक व मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका तर कर्मचारी व विकी पवार हे सुद्धा उपस्थित होते. तेथील शाळेतील मुख्याध्यापक यांनी श्री विक्रम यशवंत साबळे यांचे मनापासून आभार मानले. या वेळी विक्रम साबळे यांनी शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी आमच्या फाउंडेशन तर्फे आम्ही सातत्याने गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शैक्षणिक वाटप करीत असल्याचे त्यांनी सांगितले.



# रोवळा येथे नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत प्रशिक्षण

**तळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील रोवळा येथे डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकरी गटांचे प्रशिक्षण नुकतेच पार पडले. प्रशिक्षणात शेतकरी गटातील शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीविषयी विविध कृषी तज्ञांचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम रामचंद्र म्हातले यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.



या वेळी कृषी विज्ञान केंद्र बारामती येथील विषय विशेषज्ञ डॉ. संदीप कांबळे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते कार्यक्रमच्या सुरवातीस सहाय्यक कृषी अधिकारी गोविंद पाशीमे यांनी कार्यक्रमचे प्रास्तविक केले. यामध्ये त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेविषयी विस्तृत माहिती सांगितली तसेच सेंद्रिय शेती प्रमाणीकरण याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर मुख्या मार्गदशक डॉ. संदीप कांबळे यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती मधील १० ड्रम थिअरी तसेच ड्रम मध्ये निविष्ठा निर्मिती करणे जसे की जीवामृत बीजामृत दशपर्णी अर्क तयार करणे बाबत मार्गदर्शन केले.

पीएसबी, ऍझोटोब्याकटर, रायझोबियम, एस ९ कल्चर यांच्या वापरा बाबत विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास तळा पंचायत समितीचे माजी उपसभापती गणेश वाघमारे, विषय विशेषज्ञ डॉ. संदीप कांबळे, सहाय्यक कृषी अधिकारी गोविंद पाशिमे, गटामधील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंजुमन कॉलेजमध्ये नवीन विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत वरिष्ठ विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आले. या कार्यक्रमच्या स्वागत समारंभाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी भूषविले.

प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत करून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील नवीन संधींचे स्वागत करण्याचे व शिक्षणात गुणवत्ता आणि शिस्तीचे महत्त्व पटवून दिले. तसेच महाविद्यालयात रॅगिंग याला कायद्याने मनाई आहे आणि दोषी आढळल्यास शिक्षा होऊ शकते हा संदेश सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आला.वरिष्ठ विद्यार्थ्यांमार्फत या विद्यार्थ्यांना विविध मनोरंजन, महाविद्यालयाचे वैशिठ्ये सांगून व विविध मनोरंजनात्मक स्पर्धांसह त्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी देखील नवीन वर्षासाठी नवीन ऊर्जा आणि उद्दिष्टांसह महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात केल्याचा आनंद व्यक्त केला.

या वेळी महाविद्यालयातील विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यमान विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा.बिस्माह किल्लेदार यांच्यासह वरिष्ठ विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि अभार हफशा उलडे आणि सानीया मलेकर यांनी मानले.



# श्रावण मासानिमित्त पारायण आणि भजन स्पर्धा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य व परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने श्री लिलामृत ग्रंथाचे पारायण आणि भजन स्पर्धा आध्यात्मिक वातावरणात पार पडली. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या रायगड युवा सेने मार्फत नेहमीच सामाजिक, शैक्षणिक, समाज जनजागृती, दुर्बल घटक मदत आणि आपत्कालीन मदत असे अनेक उपक्रम रबविण्यात येतात.

आजचा युवा हा सुसंस्कारीत, सर्व गुण संपन्न आणि समाजासाठी आदर्श असला पाहिजे यासाठी जगद्गुरू श्री आणि प. पूज्य. कानिफनाथ महाराज नेहमीच युवा सेनेला अशा अध्यात्मिक उपक्रमातून त्यांच्या विचारांना दिशा देऊन त्यांना घडवण्याचा महान कार्य अविरत करत आहेत.

आजच्या या आधात्मिक कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील खालापूरसह सर्व तालुक्यातील युवा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भजन स्पर्धेत विजेत्या तालुक्यांची नावे पुढील प्रमाणे आहे.सर्वात्कृष्ट तालुके म्हणून प्रथम क्रमांक - पेण तालुका, द्वितीय क्रमांक - अलिबाग तालुका, तृतीय क्रमांक - पनवेल तालुका उत्तेजनार्थमध्ये उत्कृष्ट गायक - ऋषिकेश भोईर (उरण), उत्कृष्ट गायिका - साक्षी गुरव (उरण), उत्कृष्ट कोरस - तालुका पेण, उत्कृष्ट हार्मोनियम - करण ढेबे (खालापूर), उत्कृष्ट मृदूंग वादक - तुषार पडवळ (पनवेल), उत्कृष्ट तबला वादक - मयूर गरुड (अलिबाग), उत्कृष्ट टाळ वादक - नरेंद्र कासकर (रोहा), उत्कृष्ट चकवा वादक - प्रीतम धुरी (पनवेल)

या कार्यकामाला मार्गदर्शक म्हणून मुख्य पिठ नाणीजधाम मधून गणेश मोर - मुख्यपीठ सहाय्यक प्रमुख, सुनील वीर - मुख्यपीठ युवा निरीक्षक, आकाश पाटील - मुख्यपीठ ब्लड इन नीड प्रमुख तसेच जिल्हा सेवा समितीतील, दिनेश पाटील - उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मनिषा बढे - जिल्हा महिला अध्यक्ष, राजेश जुईकर - जिल्हा आध्यात्मिक प्रमुख, रमेश विश्वासराव - जिल्हा सामाजिक प्रमुख आदी मार्गदर्शक उपस्थित होते.

# महिलांसाठी विविध कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील साहस फाउंडेशनच्या अध्यक्षा रेश्मा कुरुप यांनी मालाबार गोल्ड अँड दमंड्सच्या सहाय्याने महिलांसाठी रॅम्प वॉक आणि फोटो शूट विथ रिअल गोल्फ अँड डायमंड्स कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन बॉलीवूड कोरिओग्राफर देव अग्निहोत्री, प्रख्यात T series चे owner भूषण कुमार ह्यांचे पर्सनल असिसिस्टन्ट रॉकी शर्मा, social इन्फ्लुएन्सर व मोटिवेशनल स्पीकर रुपेश हुलावळे व मॉडेल आणि अभिनेता भार्गवा बजाज ह्यांनी द्वीप प्रज्वल करून केले. साहस फाऊंडेशनच्या अध्यक्षा रेश्मा कुरूप यांनी या वेळी बोलताना सांगितले की, महिलांना यशस्वी मॉडेल बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महिलांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी साहस फाउंडेशन वचनबद्ध आहे.



फाउंडेशनचे ध्येय प्रतिभेचे संगोपन करणे, आत्मविश्वास वाढवणे आणि उद्योगातील शीर्ष सुवर्ण आणि फॅशन ब्रँडशी इच्छुक मॉडेल्सना जोडणे आहे. तुम्ही नुकतीच सुरुवात करत असाल किंवा तुमचा मॉडेलिंग प्रवास पुढील स्तरावर नेण्याचा विचार करत असाल, साहस फाउंडेशन तुमच्या स्वप्नांना मार्गदर्शन करण्यासाठी, समर्थन देण्यासाठी आणि प्रत्यक्षात आणण्यासाठी वचनबद्ध आहे.

एकूण ३५ स्पर्धक या कार्यक्रमामध्ये भाग घेतला होता. स्पर्धकांना क्राऊन आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन नितीन मोटधरे यांनी केले. या अनोळखी व नाविण्य पूर्ण फोटो शूट घडवून आणल्याबद्दल साहस फाउंडेशनचे अध्यक्षा रेश्मा कुरूप, उपाध्यक्ष दीपिका भांडारकर, सुनीता छेडा, चित्र महिन्द्रीगीकर, अनघा गोळे, शीतल आंबेरकर, नमिता दुबे, वृषाली पाटील, सुप्रिया सावंत, माधवी म्हात्रे, प्रिया जगताप, हर्षला, विद्या चित्ता, रश्मी झेमसे ह्यांचे सर्वत्र कौतुकाचे वर्षाव होत आहे. हि संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल अध्यक्ष रेश्मा कुरूप यांनी मालाबार गोल्ड अँड डायमंड्समधील या अमृता व इतर मॅनेजिंग कमिटीचे आभार व्यक्त केले.

# राज्यस्तरीय लगोरी स्पर्धेत रायगडला दुहेरी मुकुट

## मुले आणि मुलींच्या गटात अजिंक्यपद



**नागोठणे : बातमीदार**

महा लगोरी असोसिएशनच्या वतीने व भारतीय लगोरी फेडरेशनच्या मान्यतेने आयोजित पहिली राज्यस्तरीय ज्युनिअर लगोरी अजिंक्यपद स्पर्धा नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील क्राईस्ट अकॅडमी स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज या ठिकाणी झाली. स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या मुले आणि मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना नवी मुंबई महिला जिल्हाप्रमुख शीतल सूर्यकांत कचरे, माजी नगरसेविका दमयंती आचरे यांच्या हस्ते झाले. महा लगोरी असोसिएशनचे डायरेक्टर भरत गुरव, सचिव वैभव शिंदे, राकेश शेठ आदी उपस्थित होते. या स्पर्धेत १२ जिल्ह्यातील २१० खेळाडूंनी भाग घेतला. बक्षीस वितरण समारंभ शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त संदीप गुरव, ठाणे जिल्हा लगोरी संघटनेचे सचिव वैभव शिंदे, भारतीय लगोरी महासंघाचे विजय लोणारी आदींच्या उपस्थितीत झाला.

या स्पर्धेतून निवडलेले संघ २२ ते २४ ऑगस्ट रोजी चिपळूणमधील सावर्डे येथे होणाऱ्या नवव्या ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त बास्केटबॉल स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ३ ऑगस्ट रोजी प्री-इंटर स्कूल बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन खारघर सेक्टर १९, प्लॉट नंबर ५९ या खेळाच्या मैदानावर करण्यात आलेले आहे. या स्पर्धेत १४ वर्षा वयोगटातील मुले व मुलींचे संघ तसेच १४ वर्ष वयोगटातील मुले व मुलींचे संघ सहभागी होणार आहेत.

स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्र बास्केटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष आमदार विक्रांत पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे सुरक्षा अधिकारी व स्टेट बॉक्सिंग प्लेअर सिद्धेश टावरी, पॅराडाईज ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर मनीष भतीजा यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

खारघर स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष किरण पाटील तसेच पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका व खारघर स्पोर्ट्स अकॅडमीच्या सेक्रेटरी नेत्रा पाटील यांच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इम्तियाज (८६५२७०९००४) किंवा प्रिन्स (९००४८५३०२३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

# आमदार चषक बुद्धिबळ व कॅरम स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य अशा आमदार चषक बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धेचे आयोजन ३ ऑगस्ट रोजी पनवेल येथील आगरी समाज सभागृहात करण्यात आले. या निमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांना निमंत्रण देण्यात आले.

या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेविका नीता माळी, भाजप उत्तर रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते, शहर उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, सरचिटणीस रुपेश नागवेकर, चिटणीस संजीवनी खिल्लारे, सचिन नाझरे, सुधीर देसाई, राजा चव्हाण, नरेंद्र सोनवणे, अल्पेश पडावे, जोश्ना माळी, लीना पाटील, निखिल कोशिंबकर, विराज सावंत आदी उपस्थित होते.





























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com